SAMPLE CONTENT

# Perfect समाजशास्त्र

## इयत्ता बारावी (कला)

पाठ्यपुस्तक व बोर्डाच्या प्रश्नपत्रिका आराखड्यावर आधारित

आजच्या काळात अंकीकृत रूपांतर प्रणाली (Digital Transformation System) मुळे लोकांमधील सामाजिक आंतर क्रिया सहज व सुलभ होत आहे आणि यातून एक मजबूत सामाजिकबंध तयार होण्यास मदत होत आहे.



मेघना जाधव
M.A., M.Ed., SET (Edu., Geog.)

सुरभी जोशी
M.A. (Economics)

Published by:
LAZY BONE EDUCATION

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
यांच्याद्वारे निर्धारित नवीन पाठ्यपुस्तकावर आधारित.

PERFECT

# समाजशास्त्र

## इयत्ता बारावी (कला)

### ठळक वैशिष्ट्ये

- नवीन पाठ्यपुस्तकावर आधारित.
- संपूर्ण आशयाची मांडणी प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात.
- विविध प्रकारच्या प्रश्नांचा समावेश.
- 'पाठाची रूपरेषा' शीर्षकांतर्गत थोडक्यात पाठाचा आढावा.
- पाठाधारित, पाठांतर्गत व पाठ्येत्तर प्रश्नांचा समावेश.
- आशयानुसार बोर्डाच्या मार्च २०२० च्या प्रश्नांचा उत्तरांसहित समावेश.
- 'ज्ञानगुरू' शीर्षकांतर्गत आशयासंबंधित अधिकची रुचीपूर्ण माहिती.
- संकल्पनेची सुस्पष्टता 'आकलन हेतू स्पष्टीकरण' शीर्षकांतर्गत.
- 'ज्ञानाचे उपयोजन' शीर्षकांतर्गत कृती स्वरूपातील पाठांतर्गत प्रश्नांचा समावेश.
- आशयासंबंधित माहिती, पाठांतर्गत प्रश्न व उपक्रमांतर्गत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे Q. R. Code द्वारे उपलब्ध.
- प्रत्येक पाठाच्या शेवटी स्वयंमूल्यमापनाकरता सराव चाचणी (उत्तरे Q. R. Code द्वारे उपलब्ध).

Sample Content

Printed at: **India Printing Works,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022 | **TEID: 1995** | P.O. No. 2715

## प्रस्तावना

महाराष्ट्र पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने तयार केलेल्या इयत्ता १२ वी समाजशास्त्र पाठ्यपुस्तकामध्ये भारतीय समाजाची ओळख या उपशीर्षकांतर्गत भारतातील विविध सामाजिक समूह, विविध सामाजिक समस्या, सामाजिक चळवळी आणि सामाजिक परिवर्तन यांसंबंधित आशयाची मांडणी केली आहे. या पाठ्यक्रमाचे विश्लेषण करून तयार केलेले टार्गेट प्रकाशनाचे **Perfect समाजशास्त्र इयत्ता बारावी (कला)** हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला आनंद होत आहे.

पाठाच्या सुरुवातीला 'पाठाची रूपरेषा' या शीर्षकांतर्गत पाठाचा आढावा घेण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना पाठातील आशयाचे आकलन होण्याकरता आवश्यक तेथे Q. R. Code द्वारे माहिती पुरवण्यात आली आहे. आशयाची व्यापकता लक्षात घेता पाठाधारित प्रश्न व अधिकचे प्रश्नही देण्यात आले आहेत. 'आकलन हेतू स्पष्टीकरण' शीर्षकांतर्गत विषयातील काही संकल्पनांचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. याशिवाय, आशयासंबंधित अधिकची रंजक माहिती 'ज्ञानगुरू' शीर्षकांतर्गत देण्यात आली आहे. 'ज्ञानाचे उपयोजन' या शीर्षकाखाली कृतींच्या स्वरूपात विचारलेल्या पाठांतर्गत प्रश्नांची आवश्यकतेनुसार उत्तरे देण्यात आली आहेत. यातील काही उत्तरे व उपक्रमामधील प्रश्नांची उत्तरे ही Q. R. Code स्वरूपात उपलब्ध करण्यात आली आहेत. आशयाबाबत विद्यार्थ्यांना स्वयंमूल्यमापन करता यावे याकरता प्रत्येक पाठाच्या शेवटी सराव चाचणी दिली आहे आणि उत्तरांच्या पडताळणीकरता Q. R. Code द्वारे उत्तरे पुरवण्यात आली आहेत.

हे पुस्तक परिपूर्ण होण्याकरता आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. पुस्तकाची उत्कृष्टता अधिकाधिक वाढावी याकरता आपल्या सूचना व प्रतिक्रिया स्वागतार्ह आहेत. आपला अभिप्राय पुढील इ-मेल पत्त्यावर पाठवू शकता.

इ-मेल आयडी mail@targetpublications.org

**प्रकाशक**

**आवृत्ती:** प्रथम

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on textbook 'समाजशास्त्र: प्रथमावृत्ती: २०२०' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# वैशिष्ट्ये

**पाठाची रूपरेषा**

'पाठाची रूपरेषा' या शीर्षकांतर्गत पाठाचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.

**विविध प्रश्नप्रकार अंतर्भूत**

संपूर्ण पाठ प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात देण्यात आला आहे. यामध्ये पाठ्यपुस्तकातील सर्व प्रश्नप्रकारांचा समावेश करण्यात आला आहे.

**आकलन हेतू स्पष्टीकरण**

विद्यार्थ्यांना प्रश्नांच्या उत्तरामागची मूळ संकल्पना व्यवस्थित समजून घेता यावी याकरता आवश्यक तेथे आकलन हेतू स्पष्टीकरण (उत्तराचा भाग नसलेले) देण्यात आले आहे.

**ज्ञानगुरू**

विद्यार्थ्यांना पाठातील आशयासंबंधित अधिकची रंजक माहिती 'ज्ञानगुरू' शीर्षकांतर्गत उपलब्ध करून दिली आहे.

**उत्तरांतील महत्वपूर्ण शब्द ठळक स्वरूपात**

दीर्घोत्तरी प्रश्नांच्या उत्तरांचे आकलन व स्मरण व्हावे याकरता उत्तरातील महत्त्वाचे शब्द ठळक केले आहेत. तसेच, मुद्द्यांच्या स्वरूपात उत्तरे दिली आहेत.

**Q. R. Code**

विद्यार्थ्यांना आशयासंबंधितची अधिक माहिती, तसेच ज्ञानाचे उपयोजन शीर्षकांतर्गत कृती स्वरूपातील प्रश्न व उपक्रमांतर्गत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे आवश्यकतेप्रमाणे Q. R. Code द्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

**सराव चाचणी**

विद्यार्थ्यांना पाठासंदर्भात स्वयंमूल्यमापन करण्याच्या दृष्टीने पाठाच्या शेवटी सराव चाचणी देण्यात आली आहे आणि याची उत्तरे Q.R. Code द्वारे दिली आहेत.

Sample Content

## प्रश्नपत्रिका आराखडा

| प्र. क्र. | | प्रश्न | विकल्पांशिवाय प्रश्नांची संख्या | विकल्पांसह प्रश्नांची संख्या | विकल्पांशिवाय गुण | विकल्पांसह गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | | खालील प्रश्न सोडवा. | | | | |
| | (अ) | रिकाम्या जागा भरा. | ५ | ५ | ५ | ५ |
| | (ब) | चुकीची जोडी दुरुस्त करा. | ५ | ५ | ५ | ५ |
| | (क) | दिलेल्या पर्यायांपासून योग्य पद/संज्ञा ओळखा. | ५ | ५ | ५ | ५ |
| | (ड) | अधोरेखित शब्द दुरुस्त करा आणि विधान पूर्ण करा. | ५ | ५ | ५ | ५ |
| २. | | टिपा लिहा. (कोणत्याही दोन) | २ | ३ | ८ | १२ |
| ३. | | फरक स्पष्ट करा. (कोणतेही तीन) | ३ | ५ | १२ | २० |
| ४. | | खालील संकल्पना सोदाहरण स्पष्ट करा. (कोणत्याही दोन) | २ | ३ | ८ | १२ |
| ५. | (अ) | संकल्पनाचित्र पूर्ण करा. | १ | १ | ४ | ४ |
| | (ब) | खालील विधाने सत्य की असत्य आहेत हे कारणे देऊन सांगा. (कोणतीही दोन) | २ | ३ | ८ | १२ |
| ६. | (अ) | खालील उतारा वाचा व त्याखालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. | २ | २ | ६ | ६ |
| | (ब) | आपले व्यक्तिगत मत नोंदवा. (कोणत्याही एकावरील) | १ | २ | ४ | ८ |
| ७. | | दीर्घ उत्तर (कोणतेही एक) | १ | २ | १० | २० |
| | | **एकूण गुण** | ३४ | ४१ | ८० | ११४ |

## अनुक्रमणिका


| घटक | पाठाचे नाव | विकल्पांशिवाय गुण | विकल्पांसह गुण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| | **विभाग १** | | | |
| १. | भारतीय समाजाचा परिचय | १२ | १९ | १ |
| २. | भारतीय समाजाचे वर्गीकरण | १३ | १८ | २४ |
| ३. | भारतीय समाजातील विविधता आणि एकता | १२ | १५ | ४८ |
| ४. | भारतीय समाजातील परिवर्तनाच्या प्रक्रिया | १२ | १९ | ६४ |
| ५. | भारतातील सामाजिक चळवळी | १२ | १५ | ८० |
| ६. | भारतातील सामाजिक समस्या | १३ | २२ | ९८ |
| | **विभाग २** | | | |
| ७. | उतारे | ०६ | ०६ | ११९ |


**टीप:** १. पाठाखालील स्वाध्यायांतर्गत दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.
२. पाठामध्ये चौकटीत दिलेल्या आशयासंबंधित प्रश्न # या चिन्हाने दर्शवले आहेत.

Sample Content

विभाग १

# १ भारतीय समाजाचा परिचय

## पाठाची रूपरेषा

| | |
|---|---|
| **परिचय** | १. समाजशास्त्रज्ञांना मानवी वर्तनावर प्रभाव पाडणाऱ्या कारणांचे आकलन करण्यात रस असतो.<br>२. आपली संस्कृती ही हजारो वर्षे इतकी प्राचीन आहे, ज्याकाळी 'समाजशास्त्र' नावाच्या स्वतंत्र ज्ञानशाखेचा उदयही झाला नव्हता.<br>३. प्राचीन काळातील लोकांचे समाजजीवन आपल्याला विविध स्रोतांद्वारे समजते.<br>४. अभ्यासकांनी प्राचीन भारताच्या इतिहासाला तीन भिन्न कालखंडांमध्ये विभागले आहे. |
| **प्राचीन आणि मध्ययुगीन भारत** | १. वेदकालीन संस्कृती ही साधारणपणे दोन भागांत विभागली गेली आहे. पूर्व वैदिक संस्कृती आणि उत्तर वैदिक संस्कृती.<br>२. **धार्मिक श्रद्धाप्रणाली आणि आचार:** अभ्यासकांच्या मते सध्या उपलब्ध असलेल्या धार्मिक आचारांसंबंधींचे साहित्य हे गुंतागुंतीचे आहे. हिंदू, जैन, बौद्ध हे प्राचीन काळातील काही धर्म होते. मध्ययुगीन काळात भारतात अनेक धर्म बाहेरून आले. यांत ज्युडाइझम, ख्रिश्चन, इस्लाम आणि कालांतराने आलेल्या पारशी धर्माचा समावेश आहे.<br>३. **भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान:** पूर्व वैदिक काळात पितृसत्ताक समाजव्यवस्था अस्तित्वात होती. स्त्रियांना उत्तर वैदिक काळाच्या तुलनेत पूर्व वैदिक काळात उच्च दर्जाचे सामाजिक स्थान होते. मध्ययुगीन काळात स्त्रियांचे सामाजिक स्थान पार खालावले गेले.<br>४. **शिक्षण पद्धती:** पूर्व वैदिक काळात बौद्धिक आणि व्यक्तिमत्त्व विकास करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट होते. उत्तर वैदिक काळात स्त्रियांच्या शिक्षणावर कडक निर्बंध घालण्यात आले. मोक्षप्राप्तीसाठी विरक्तीवर आधारलेला तापसी जीवनाचा मार्ग अनेकांनी अवलंबला. आध्यात्मिक नेतृत्व करणारे पंथ अस्तित्वात आले. मध्ययुगीन शिक्षण पद्धतीत 'कुराण' ला महत्त्व प्राप्त झाले. मध्ययुगीन काळात सुव्यवस्थित शिक्षण पद्धतीच्या ऱ्हासाचीही सुरुवात झाली.<br>५. **समाजजीवन:** संघम साहित्यात विविध पारंपरिक जाती आणि जमातींचा उल्लेख आढळतो. वैदिक संस्कृतीच्या उत्तरार्धात वर्णव्यवस्थेचे रूपांतर कडक निर्बंध असलेल्या जातिव्यवस्थेच्या उतरंडीत झाले. भारतीय समाजाने गुप्त साम्राज्याच्या अभिजात संस्कृतीच्या काळात जीवनाच्या सर्व क्षेत्रांतील समृद्धी अनुभवली. मध्ययुगीन काळात भारताने अनेक परकीय आक्रमणे अनुभवली.<br>६. **शहरीकरण:** हडप्पा संस्कृतीत असलेल्या पूर्वनियोजित नगरांमुळे तेथील जीवनप्रणालीस 'पहिली नागरी संस्कृती' असे संबोधले जाते. इसवी सन पूर्व सुमारे ५०० ते २०० वर्षे कालखंडात गंगा नदीच्या खोऱ्यात 'दुसरे नागरीकरण' झाले. |
| **वसाहतकालीन भारत** | १. वसाहतकालीन भारतातील कालखंड हा युरोपियन देशांची भारतावर सत्ता प्रस्थापित करण्याचा कालखंड समजला जातो.<br>२. भारतातील ब्रिटिश सत्तेत अनेक संस्थात्मक व सामाजिक सुधारणा घडून आल्या.<br>३. वसाहतकाळाचे भारतावर अनेक परिणाम झाले.<br>४. **शिक्षण पद्धती:** ब्रिटिशांनी भारतात शिक्षण व्यवस्था अंमलात आणली, ज्याचे भारतीय समाजावर दूरगामी परिणाम झाले. १८५६ च्या 'इंडियन युनिव्हर्सिटीज ॲक्ट' अन्वये भारतातील पहिल्या विद्यापीठांची स्थापना झाली.<br>५. **संस्कृती:** भारतातील सुशिक्षित वर्गातील अनेक अभिजनांनी ब्रिटिश जीवनशैलीचा अंगीकार केला. डॉ. एम. एन. श्रीनिवास यांनी या प्रक्रियेस 'वेस्टर्नायझेशन' (पाश्चात्त्यीकरण) असे म्हटले.<br>६. **प्रशासन:** ब्रिटिशांनी भारतात नव्या प्रशासकीय यंत्रणा उभारल्या. त्यांनी आर्थिक, शिक्षण, महसूल आणि प्रशासकीय सेवा यांसारख्या विविध सेवांचे विभाग स्थापन केले. तसेच, त्यांनी नवीन न्याय पद्धतीही अस्तित्वात आणली. |

Sample Content

| | |
|---|---|
| | ७. **अर्थव्यवस्था:** औद्योगिक वाढीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेत मूलभूत स्वरूपाचे बदल घडून आले. शिक्षण व उत्पन्न यांवर आधारित नवीन सामाजिक वर्ग उदयास आले. निर्वाह अर्थव्यवस्थेचे नफ्यावर पोसल्या जाणाऱ्या बाजार व्यवस्थेत रूपांतर झाले.<br>८. **दळणवळण आणि संपर्क:** दळणवळणांच्या सोयींमुळे देशाच्या कानाकोपऱ्यांतील लोकांपर्यंत आणि स्रोतांपर्यंत पोहोचणे शक्य झाले. दळणवळण आणि संपर्क साधनांमधील सुधारणांमुळे भारतातील कच्च्या मालासाठी अधिक बाजारपेठा उपलब्ध झाल्या.<br>९. **राष्ट्रवादाची चळवळ:** राष्ट्रवादाचा प्रसार व प्रचार झाला आणि राष्ट्रवादी चळवळीस चालना मिळाली. १९ व्या शतकात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा उदय झाला.<br>१०. **समाजसुधारणेच्या चळवळी:** सुशिक्षित भारतीयांनी सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी पुढाकार घेतला. अनेक सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी उभ्या राहिल्या. त्यांनी समाजातील कालबाह्य, दडपणाऱ्या आणि प्रतिगामी प्रथा नष्ट करण्यासाठी संघर्ष सुरू ठेवला.<br>११. **सामाजिक कायदे:** समाजसुधारणा करणारे गट आणि संस्था यांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे समाजात प्रचलित असलेल्या कुप्रथांवर बंदी आणणारे कायदे अंमलात आणण्यासाठी ब्रिटिश सरकारवर दडपण आणणे त्यांना शक्य झाले. |
| **स्वातंत्र्योत्तर भारत** | १. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताच्या ध्येय धोरणांमध्ये अनेक बदल झाले. १९४७ नंतर भारताच्या घडणीसाठी अनेक महत्त्वाचे घटक कारणीभूत ठरले.<br>२. **भारताचे संविधान:** मसुदा समितीने संविधान तयार केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष होते. भारतीय संविधान उदारता, समानता व बंधुता या मूल्यांची जोपासना करते. संविधानात वेळोवेळी काही महत्त्वाच्या सुधारणाही केल्या गेल्या आहेत.<br>३. **कायदे:** भारतीय संसदेद्वारे कायदे तयार केले जातात व कालानुरूप आवश्यकतांनुसार वेळोवेळी या कायद्यांमध्ये सुधारणाही केल्या जातात किंवा कालबाह्य कायदे रद्दही केले जातात.<br>४. **अर्थव्यवस्था:** भारताच्या आर्थिक विकासाकरता १९५१ ते २०१७ या कालावधीत अनेक पंचवार्षिक योजना राबवण्यात आल्या. राजकीय यंत्रणा आणि अर्थव्यवस्था यांच्यातील अन्योन्य संबंध कौतुकास्पद आहे. १९९१ मधील निर्णायक बदलामुळे जागितिकीकरणाचे वारे वाहू लागले. २०१४ पासून चलनबंदी, वस्तू आणि सेवा कर (GST), स्वच्छ भारत मोहिम, उद्योजकांना प्रोत्साहन यांसारखे बदल महत्त्वाचे ठरले आहेत.<br>५. **शिक्षण:** शाळा, विद्यापीठे, स्वायत्त संस्था इत्यादींच्या संख्येत लक्षणीय वाढ झालेली दिसून येते. शिक्षण क्षेत्रासमोरील आव्हाने संपलेली दिसत नाहीत. २०१९ मध्ये नवीन शैक्षणिक धोरणाच्या संदर्भातील मसुदा तयार करण्यात आला.<br>६. **राजकीय यंत्रणा:** स्वातंत्र्योत्तर भारतात राजकीय यंत्रणा लोकशाहीच्या तत्त्वांचे अनुसरण करणारी होती. भारतीय राजकीय व्यवस्था पूर्वी अस्तित्वात असलेल्या संस्थानिक नवाब, राजे, राण्या यांची राजवट इत्यादींच्या अधिकारांना मान्यता देत नाही. कायद्यासमोर सर्व नागरिकांना समान दर्जा आहे. |

## प्र.१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.

#१. मानवशास्त्राचा _______ ज्ञानशाखा म्हणून उदय झाला.
(प्राचीन, वसाहतकाळात, मध्ययुगीन)

*२. दीक्षा घेऊन बौद्ध विहारामध्ये राहणाऱ्या पुरुषांना _______ म्हणत असत. (भिक्खू, भिक्खुणी, ऋषी)

३. दिगंबर जैन _______ ही निर्वाणाच्या मार्गावरील मूलभूत गोष्ट आहे, असे मानतात. वर्धमान महावीरांनीही स्वत: या गोष्टीचा पुरस्कार केला होता.
(वस्त्रविहीनता, अहिंसा, प्रामाणिकता)

#४. जैन परंपरेतील १६ सतींपैकी पाच पूजनीय सतींना _______ परंपरेतही महत्त्वाचे स्थान आहे. (हिंदू, बौद्ध, शीख)

५. दिल्लीच्या _______ सत्तांनी एक मोठे साम्राज्य उभे केले.
(इस्लामिक, बौद्ध, ज्युईश)

६. _______ पंथात मानवतेची एकता आणि अल्लाहच्या दरबारी सर्वांचे समान स्थान या तत्त्वांना महत्त्व होते.
(पारशी, सुफी, ज्युडाइझम)

७. ख्रिश्चन व इस्लाम हे दोन्ही धर्म _______ आहेत.
(एकेश्वरवादी, बहुईश्वरवादी, द्वैतवादी)

Sample content

८. पूर्व वैदिक काळात वेदविद्या प्राप्त केलेल्या स्त्रियांचे ________ प्रकार ऋग्वेदात सांगितलेले आहेत.
(चार, सहा, दोन)

९. ________मध्ये अनुलोम व प्रतिलोम विवाहांचा उल्लेख आढळतो. (वेद, उपनिषद, कुराण)

१०. हडप्पा संस्कृतीमध्ये, ________ वरील कोरलेल्या शिलालेखांमुळे ते लोक लिपीचा वापर करत होते हे समजते.
(शिल्प, मुद्रा, नाणी)

११. ________ चैत्य हे पृथ्वीतत्त्व आणि भूतमात्रांची स्थानके असल्याचे मानले जाई. (विहार, बौद्ध, महावीर)

१२. ________ व्यवस्थेची उतरंड 'पवित्र' व 'अपवित्र' या कल्पनांवर आधारित होती. (वर्ण, चैत्य, जाती)

१३. ________ वर्णियांना उपनयन संस्काराचा अधिकार नव्हता.
(क्षत्रिय, शूद्र, वैश्य)

१४. ________ काळात नीतिशास्त्र आणि धर्मशास्त्र या विषयांवर अनेक ग्रंथ लिहिले गेले.
(दुसरे नागरीकरण, गुप्त साम्राज्य, मुघल)

१५. भारतात ________ काळ हा युरोपियन देशांनी सत्ता प्रस्थापित करण्याचा कालखंड समजला जातो.
(प्राचीन, वसाहत, मध्ययुगीन)

१६. सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात ________ आणि ब्रिटिश भारताच्या किनाऱ्यावर उतरले. (डच, फ्रेंच, पोर्तुगीज)

१७. ________येथे फ्रेंचांचे अस्तित्व प्रकर्षाने जाणवले.
(पुदुच्चेरी, कोलकता, बंगळुरू)

१८. ब्रिटिशांनी ________ शतकापर्यंत भारतावर राज्य केले.
(विसाव्या, अठराव्या, एकविसाव्या)

१९. ________ शतकामध्ये सामाजिक आणि धार्मिक सुधारणेच्या अनेक चळवळी उभ्या राहिल्या.
(एकोणिसाव्या, अठराव्या, विसाव्या)

२०. ________ हे वहाबी चळवळीचे संस्थापक होते.
(सैद वलीउल्लाह, राधाकांत देब, इरोदे व्ही रामस्वामी)

*२१. स्पेशल मॅरेज ॲक्ट ________या वर्षी पारित करण्यात आला.
(१९५०, १९५२, १९५४)

२२ भारताचे संविधान तयार करण्यासाठी ६ डिसेंबर १९४६ रोजी ________ ची स्थापना झाली.
(मसुदा समिती, सामाजिक समिती, मसुदा संघ)

२३. नवीन शैक्षणिक धोरणाच्या संदर्भातील मसुदा ________मध्ये तयार करण्यात आला. (२०१८, २०१६, २०१९)

२४. ________ हा लोकप्रिय लोकशाही देश आहे.
(चीन, भारत, अमेरिका)

२५. ________ हे लोकशाही व्यवस्थेतील महत्त्वाचे मूल्य आहे.
(एकता, विविधता, सहमती)

**उत्तरे:**

| | |
|---|---|
| १. वसाहतकाळात | २. भिक्खू |
| ३. वस्त्रविहीनता | ४. हिंदू |
| ५. इस्लामिक | ६. सुफी |
| ७. एकेश्वरवादी | ८. दोन |
| ९. उपनिषद | १०. मुद्रा |
| ११. बौद्ध | १२. जाति |
| १३. शूद्र | १४. दुसरे नागरीकरण |
| १५. वसाहत | १६. डच |
| १७. पुदुच्चेरी | १८. विसाव्या |
| १९. एकोणिसाव्या | २०. सैद वलीउल्लाह |
| २१. १९५४ | २२. मसुदा समिती |
| २३. २०१९ | २४. भारत |
| २५. सहमती | |

**प्र.१. (ब) पुढील प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व दुरुस्त करून लिहा.**

१. i. हडप्पा संस्कृती – इ.स.पू. २६०० - १५००
ii. वैदिक काळ – इ.स.पू. १५०० - ५००
iii. अभिजात काळ – इ.स.पू. २०० - ६५०
iv. मध्ययुगीन भारत – इ.स.पू. ५०० - २००

*२. i. राजमार्ग – हिंदू धर्म
ii. तीर्थंकर – जैन धर्म
iii. सेंट थॉमस – शीख धर्म
iv. अष्टांग मार्ग – बौद्ध धर्म

३. i. ब्रह्मचर्याश्रम – विद्यार्थी दशा, अविवाहित, ब्रह्मचर्य
ii. गृहस्थाश्रम – गृहस्थ
iii. वानप्रस्थाश्रम – एकांतवासी, निवृत्त होणे.
iv. संन्यासाश्रम – भौतिक सुखांचा उपभोग घेणे.

४. i. जाती – जन्मावर निर्धारित
ii. त्रिपिटक – जैन धर्मग्रंथ
iii. अनुलोम विवाह – उच्चवर्णीय वराचा कनिष्ठ वर्णाच्या वधुशी विवाह
iv. ज्यू धर्म – एकेश्वर वाद

Sample Content

५. i. आर्य समाज – स्वामी दयानंद सरस्वती
ii. प्रार्थना समाज – बेहरामजी मलबारी
iii. सत्यशोधक समाज – महात्मा फुले
iv. हरिजन सेवक संघ – महात्मा गांधी

६. i. स्पेशल मॅरेज कायदा – १९५४
ii. हिंदू कोड बिल – १९५५
iii. हुंडा प्रतिबंधक कायदा – १९६१
iv. द ट्रान्सजेन्डर पर्सन्स् (प्रोटेक्शन ऑफ राइट्स) कायदा – २०१५

**उत्तरे:**

१. **चुकीची जोडी:** मध्ययुगीन भारत – इ.स.पू. ५०० - २००
**योग्य जोडी:** मध्ययुगीन भारत – इ.स. ६५० - १५००

२. **चुकीची जोडी:** सेंट थॉमस – शीख धर्म
**योग्य जोडी:** सेंट थॉमस – ख्रिश्चन धर्म

३. **चुकीची जोडी:** संन्यासाश्रम – भौतिक सुखांचा उपभोग घेणे.
**योग्य जोडी:** संन्यासाश्रम – संन्यास सर्वसंग परित्याग

४. **चुकीची जोडी:** त्रिपिटक – जैन धर्मग्रंथ
**योग्य जोडी:** त्रिपिटक – बौद्ध धर्मग्रंथ

५. **चुकीची जोडी:** प्रार्थना समाज – बेहरामजी मलबारी
**योग्य जोडी:** प्रार्थना समाज – आत्माराम पांडुरंग तर्खडकर

६. **चुकीची जोडी:** द ट्रान्सजेन्डर पर्सन्स् (प्रोटेक्शन ऑफ राइट्स) कायदा – २०१५
**योग्य जोडी:** द ट्रान्सजेन्डर पर्सन्स् (प्रोटेक्शन ऑफ राइट्स) कायदा – २०१९

## प्र.१. (क) प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.

| संज्ञा |
|---|
| ब्राह्मो समाज, आजीविका, मध्ययुग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ब्रह्मवादिनी, धर्मनिरपेक्षता, समाजशास्त्रीय चिंतन, हरिजन सेवक संघ, सद्यवधू, सत्तेचे विकेंद्रीकरण, गौतम धर्मसूत्र, निर्ग्रंथ, आर्य समाज, साधू, प्राच्यविद्याशाखा, होलोकॉस्ट (वंशविच्छेदाची भट्टी) |

#१. मानवशास्त्राच्या टीकाकारांकडून वसाहतिक अभ्यासाचा भाग म्हणून या विद्याशाखेचा अभ्यास करण्यात आला.
#२. या पंथाच्या तत्त्वानुसार याचा उगम दैववाद आणि तापसी जीवनपद्धती यातून झालेला आहे.
#३. युरोपमधील जवळजवळ ११ दशलक्ष लोकांना नाझी (जर्मन) राजवटीकडून जिवंत जाळण्यात (सामूहिक हत्या) आले. त्या घटनेचा निर्देश करण्यासाठी वापरला जाणारा शब्द.
४. पूर्व वैदिक काळातील उपनयनाचा संस्कार पूर्ण होताच गुरुगृही न जाता विवाह होऊन सासरी पाठवल्या गेलेल्या स्त्रिया.
५. पूर्व वैदिक काळातील आजन्म अविवाहित राहून वेदांचे अध्ययन आणि अध्यापन करणाऱ्या स्त्रिया.
६. या ग्रंथात मुलीचे कौमार्य आणि पावित्र्य भंग होऊ नये, म्हणून तिचा विवाह तिला ऋतुप्राप्ती होण्याअगोदर करावा असे म्हटलेले आहे.
७. या संप्रदायास कालांतराने जैन म्हणजेच जिन (वर्धमान महावीर) यांचे अनुयायी असे संबोधले जाऊ लागले.
८. यास भारताच्या इतिहासातील सर्वाधिक अंध:काराचा काळ म्हटले जाते.
९. सर्वसंग परित्यागाचा मार्ग निवडणारे लोक.
१०. ऐतिहासिक घडामोडी आणि त्यामुळे अनेकदा निर्माण झालेली अस्थिर परिस्थिती व त्यातील अनेक स्तरांवरील गुंतागुंत समजून घेणारा विकसित दृष्टिकोन.
*११. राजा राममोहन रॉय यांनी स्थापन केलेली संघटना.
१२. वैदिक परंपरांचे पुनरुज्जीवन आणि वैदिक ज्ञान आधुनिक अभ्यासक्रमांमध्ये समाविष्ट करणे यांसाठी प्रयत्न करणारी संघटना.
*१३. भारतीय संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष.
१४. भारतीय संविधानातील हे मूल्य सर्व धर्मांच्या लोकांचा आदर करते.
१५. भारतात लोकशाही पद्धतीवर आधारलेले हे तत्त्व स्वीकारलेले आहे.

**उत्तरे:**

१. प्राच्यविद्याशाखा
२. आजीविका
३. होलोकॉस्ट (वंशविच्छेदाची भट्टी)
४. सद्यवधू
५. ब्रह्मवादिनी
६. गौतम धर्मसूत्र
७. निर्ग्रंथ
८. मध्ययुग
९. साधू
१०. समाजशास्त्रीय चिंतन
११. ब्राह्मो समाज
१२. आर्य समाज
१३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर
१४. धर्मनिरपेक्षता
१५. सत्तेचे विकेंद्रीकरण

## प्र.१. (ड) अधोरेखित शब्दाच्या जागी अचूक शब्द लिहून विधाने पूर्ण करा.

#१. **चार्वाक कथा साहित्यामध्ये गौतम बुद्धांच्या पूर्वजन्मांच्या कथांचा समावेश आहे.**

**उत्तर:** जातक कथा साहित्यामध्ये गौतम बुद्धांच्या पूर्वजन्मांच्या कथांचा समावेश आहे.

Sample Content

२. **५ मुस्लीम राजघराण्यांनी दिल्लीमधून भारतावर सुमारे २३० वर्षे राज्य केले.**

**उत्तर:** ५ मुस्लीम राजघराण्यांनी दिल्लीमधून भारतावर सुमारे ३२० वर्षे राज्य केले.

३. **ऋग्वेदामध्ये सुंदर स्त्रियांना अत्यंत मानाचे स्थान होते.**

**उत्तर:** ऋग्वेदामध्ये वेदविद्या प्राप्त केलेल्या स्त्रियांना अत्यंत मानाचे स्थान होते.

४. **अपाला, घोषा, लोपामुद्रा, गार्गी, मैत्रेयी या कुराणाचे ज्ञान प्राप्त केलेल्या पंडिता विशेष नावाजलेल्या होत्या.**

**उत्तर:** अपाला, घोषा, लोपामुद्रा, गार्गी, मैत्रेयी या वेद आणि उपनिषदांचे ज्ञान प्राप्त केलेल्या पंडिता विशेष नावाजलेल्या होत्या.

५. **मध्ययुगीन काळात वर्णव्यवस्थेचे कडक निर्बंध असलेल्या जातिव्यवस्थेत रूपांतर झाले.**

**उत्तर:** उत्तर वैदिक काळात वर्णव्यवस्थेचे कडक निर्बंध असलेल्या जातिव्यवस्थेत रूपांतर झाले.

#६. **किरपान, कछेरा, केश, कडा आणि कंगा हे जैन धर्मातील पंचकार आहेत.**

**उत्तर:** किरपान, कछेरा, केश, कडा आणि कंगा हे शीख धर्मातील पंचकार आहेत.

#७. **महाराष्ट्रात इसवी सन १३ व्या शतकात संत नामदेवांच्या काळात भक्तीचळवळीचा उगम झाला.**

**उत्तर:** महाराष्ट्रात इसवी सन १३ व्या शतकात संत ज्ञानेश्वरांच्या काळात भक्तीचळवळीचा उगम झाला.

८. **महावीर केवलिन, जिन आणि महावीर म्हणून ओळखले जाऊ लागल्यानंतर ते मिर्ग्रंथ या संप्रदायाचा भाग झाले.**

**उत्तर:** महावीर केवलिन, जिन आणि महावीर म्हणून ओळखले जाऊ लागल्यानंतर ते निर्ग्रंथ या संप्रदायाचा भाग झाले.

९. **वर्धमान महावीरांनी जैन धर्माच्या उपदेशासाठी पाच दशके भ्रमण केले.**

**उत्तर:** वर्धमान महावीरांनी जैन धर्माच्या उपदेशासाठी तीन दशके भ्रमण केले.

१०. **ज्युडाइझम जीवनाविषयक अरेषीय दृष्टिकोन बाळगते.**

**उत्तर:** ज्युडाइझम जीवनाविषयक एकरेषीय दृष्टिकोन बाळगते.

११. **बुद्ध आणि महावीर यांनी विधी, अंधश्रद्धेवर आधारलेल्या प्रथा, मूर्तिपूजा आणि तीर्थयात्रा यांसारख्या बाह्योपचारांचा निषेध केला.**

**उत्तर:** कबीर आणि रहीम यांनी विधी, अंधश्रद्धेवर आधारलेल्या प्रथा, मूर्तिपूजा आणि तीर्थयात्रा यांसारख्या बाह्योपचारांचा निषेध केला.

१२. **इस्लाम धर्मानुसार प्रत्येकाला एकच जन्म मिळतो आणि त्या जन्मातील त्यांच्या वर्तणुकीच्या आधारे त्यांना स्वर्गात प्रवेश मिळेल, की नाही याचा निवाडा केला जातो.**

**उत्तर:** ख्रिश्चन धर्मानुसार प्रत्येकाला एकच जन्म मिळतो आणि त्या जन्मातील त्यांच्या वर्तणुकीच्या आधारे त्यांना स्वर्गात प्रवेश मिळेल, की नाही याचा निवाडा केला जातो.

*१३. **मध्ययुगीन काळात खानक्वा या धार्मिक स्वरूपाच्या संस्थांमध्ये प्राथमिक शिक्षण दिले जाई.**

**उत्तर:** मध्ययुगीन काळात खानक्वा या धार्मिक स्वरूपाच्या संस्थांमध्ये अल्लाहविषयीच्या परमोच्च तत्त्वांचे शिक्षण दिले जाई.

१४. **ज्यू वर्ग हा संख्येने कमी असला तरी तमीळ संस्कृतीच्या घडणीमध्ये त्यांचे स्थान महत्त्वाचे होते.**

**उत्तर:** ब्राह्मण वर्ग हा संख्येने कमी असला तरी तमीळ संस्कृतीच्या घडणीमध्ये त्यांचे स्थान महत्त्वाचे होते.

१५. **पवित्र आणि भेदाभेद या कल्पनांचा विविध गोष्टींवर पगडा होता.**

**उत्तर:** पवित्र आणि विटाळ या कल्पनांचा विविध गोष्टींवर पगडा होता.

१६. **स्वत:ला 'द्विज' म्हणवणाऱ्यांसाठी संन्यासाश्रमात जीवनविषयक मार्गदर्शन केले होते.**

**उत्तर:** स्वत:ला 'द्विज' म्हणवणाऱ्यांसाठी आश्रमव्यवस्थेत जीवनविषयक मार्गदर्शन केले होते.

१७. **हडप्पा संस्कृतीमधील सामाजिक परिस्थिती ही मुंबई आणि दिल्ली येथील समकालीन प्रगत नागरी संस्कृतीसारखीच प्रगत होती.**

**उत्तर:** हडप्पा संस्कृतीमधील सामाजिक परिस्थिती ही मेसोपोटेमिया आणि इजिप्त येथील समकालीन प्रगत नागरी संस्कृतीसारखीच प्रगत होती.

#१८. **अद्भुत परंपरा संकल्पना मिल्टन सिंगर आणि रॉबर्ट रेडफिल्ड यांनी मांडल्या.**

**उत्तर:** प्रमुख आणि उपपरंपरा संकल्पना मिल्टन सिंगर आणि रॉबर्ट रेडफिल्ड यांनी मांडल्या.

१९. **पोर्तुगीज व्यापाराच्या उद्देशाने १३ व्या शतकात भारतात आले.**

**उत्तर:** पोर्तुगीज व्यापाराच्या उद्देशाने १६ व्या शतकात भारतात आले.

Sample Content

**२०. ब्रिटिशांच्या राजवटीत भारतात ख्रिश्चन धर्माच्या सुफी परंपरेचा प्रभाव अधिक होता.**

**उत्तर:** ब्रिटिशांच्या राजवटीत भारतात ख्रिश्चन धर्माच्या अँग्लिकन परंपरेचा (चर्च ऑफ इंग्लंड) प्रभाव अधिक होता.

**२१. प्राचीनकाळात शिक्षणामुळे बुद्धिनिष्ठता, समानता, सामाजिक न्याय आणि व्यक्तिवाद ही मूल्ये समाजात खोलवर रूजली.**

**उत्तर:** वसाहत काळात शिक्षणामुळे बुद्धिनिष्ठता, समानता, सामाजिक न्याय आणि व्यक्तिवाद ही मूल्ये समाजात खोलवर रूजली.

***२२. थिऑसॉफिकल सोसायटी स्थापन करण्यात महात्मा गांधींचा पुढाकार होता.**

**उत्तर:** थिऑसॉफिकल सोसायटी स्थापन करण्यात ॲनी बेझंट यांचा पुढाकार होता.

**२३. परिवर्तन घडवून आणणाऱ्या गटांची संख्या वाढल्यामुळे समाजातील दुष्ट प्रथांवर बंदी आणणारे कायदे अंमलात आणण्यासाठी ब्रिटिशांवर दडपण आणणे भारतीयांना शक्य झाले.**

**उत्तर:** समाजसुधारणा घडवून आणणाऱ्या गटांची संख्या वाढल्यामुळे समाजातील दुष्ट प्रथांवर बंदी आणणारे कायदे अंमलात आणण्यासाठी ब्रिटिशांवर दडपण आणणे भारतीयांना शक्य झाले.

**२४. राजकीय पक्ष हे आंतरराष्ट्रीय, राज्य किंवा प्रादेशिक पातळीवरचे असू शकतात.**

**उत्तर:** राजकीय पक्ष हे राष्ट्रीय, राज्य किंवा प्रादेशिक पातळीवरचे असू शकतात.

## प्र.२. टिपा लिहा.

### १. हिंदूंची वैदिक काळातील धार्मिक श्रद्धाप्रणाली

**उत्तर:**

i. वैदिक कालखंड हा साधारणपणे पूर्व वैदिक (इ. स. पू. १५०० ते १००० वर्षे) आणि उत्तर वैदिक (इ. स. पू. १००० ते ५०० वर्षे) अशा दोन कालखंडांत विभागलेला आहे.

ii. हिंदूंची वैदिक काळातील धार्मिक श्रद्धाप्रणाली व आचार यांविषयीची माहिती ही अनेक वैदिक ग्रंथांतून मिळते. त्यातील काही लिखित, तर काही मौखिक स्वरूपात जपलेली आहे. त्यात वेदसंहिता, उपवेद, वेदांगे, ब्राह्मणग्रंथ, आरण्यके व महाकाव्ये यांचा समावेश आहे.

iii. पुराणे आणि धर्मशास्त्रावरील ग्रंथ यांत कर्मसिद्धान्तावर आधारित हिंदूंच्या आचार पद्धतीचे वर्णन केले गेले आहे. यालाच कार्यकारणपरंपरेचा सिद्धान्त असे म्हटले जाते.

iv. हिंदूंचा जन्ममृत्यूच्या चक्रावर विश्वास असून त्यानुसार व्यक्तीच्या एका जन्मातील कर्मसंचित पुढील जन्माचा आलेख निश्चित करते. आत्मा हा मोक्ष मिळेपर्यंत पुन्हा पुन्हा जन्म आणि मृत्यू या चक्रात अडकलेला असतो.

v. धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे हिंदू व्यक्तीच्या आयुष्यातील चार महत्त्वाचे पुरुषार्थ मानलेले आहेत.

vi. हिंदू धार्मिक श्रद्धाप्रणालीत यज्ञविधी आणि पशुबळी यांना महत्त्व देण्यात आले.

vii. अभ्यासकांच्या मतानुसार पूर्व वैदिक काळातील समाज हा व्यवसायाधिष्ठित सामाजिक वर्णपद्धतीच्या बाबतीत ताठर नव्हता.

viii. मात्र, कालांतराने वर्णपद्धतीच्या सीमा अधिक ताठर झाल्या आणि जातिव्यवस्था निर्माण झाली.

ix. पुरोहित वर्गाचे वर्चस्व असलेल्या आणि 'पवित्र आणि अपवित्र' या कल्पनांवर आधारित जातिव्यवस्थेतील स्तरांची उतरंड खोलवर रुजत गेली.

x. यामुळे, जाती अंतर्गत विवाह सक्ती, धार्मिक आचारविधींना अवास्तव महत्त्व आणि जातीजातींमधल्या सीमा अत्यंत कठोर होत गेल्या.

**आकलन हेतू स्पष्टीकरण**

अंतर्गत विवाह म्हणजे आपल्या सांस्कृतिक समूहातच (सगोत्र/सजातीय) विवाह करणे. (उदा. जात, पंथ, जमात.)

### २. जैन तत्त्वप्रणालीचा भारतीय समाजावरील प्रभाव

**[मार्च २०२०]**

**उत्तर:**

i. जैन धर्माची परंपरा अत्यंत प्राचीन असल्याचे समजले जात असून यात २४ तीर्थंकर होऊन गेले. वर्धमान महावीर हे चोविसावे तीर्थंकर होते. त्यांनी अर्धमागधी या लोकभाषेत आपला उपदेश केला. जैन धर्माच्या उपदेशासाठी त्यांनी तीन दशके भ्रमण केले.

ii. त्यांनी यज्ञविधी, पशुबळीया प्रथा, तसेच सामाजिक उतरंड या गोष्टींना विरोध केला आणि व्रतस्थ जीवनपद्धतीच्या दैनंदिन नियमांना महत्त्व दिले.

iii. या धर्मात समाजाच्या सर्व स्तरांतील व्यक्तींना प्रवेश दिला. त्यामुळे, मोक्षाचा हक्क समाजातील विशिष्ट वर्गापुरताच मर्यादित राहिला नाही.

iv. अनेक जैन साध्वींनी सतीप्रथा, दासीप्रथा आणि पशुबळीची पद्धत यांसारख्या गोष्टी संपुष्टात आणण्याकरता योगदान दिले आहे.

v. वर्धमान महावीरांच्या निर्वाणानंतर काही काळाने त्यांच्या उपदेशाचा प्रसार कमी झाला; मात्र पुढे सुमारे बाराशे वर्षांच्या कालखंडामध्ये कोणताच नवीन व प्रभावी धर्म उदयाला आला नाही.

sample content

### ३. संघम कालखंडातील धार्मिक आचारपद्धती व शिक्षण

**उत्तर:**

i. संघम कालखंड (इ. स. पू. ६ वे शतक ते इ. स. पू. ३ रे शतक) हा दक्षिण भारतातील (साधारणपणे आजचे तमिळनाडू आणि केरळ या राज्यांचा प्रदेश) प्राचीन इतिहासाचा काळ आहे.

ii. मदुराई शहरातील तमीळ कवी आणि साहित्यिकांच्या संघमामुळे (परिषद) यास 'संघम कालखंड' असे म्हटले जाते.

iii. संघम कालखंडात समाजावर धर्माचा पगडा फार तीव्र नव्हता. विविध प्रकारचे विधी आणि भक्ती या दोन्हींवर संघम काळातील लोकांचे आचरण आधारलेले होते.

iv. यांचे धार्मिक विधी हे भूतप्रेतादी आणि तत्सम देवतांच्या उपासनेशी निगडित होते. वृक्ष, दगड, जल, प्राणी, तारे आणि ग्रह यांची पूजा केली जात असे.

v. संघम काळातील तमीळ लोकांना काही आध्यात्मिक आणि तात्त्विक सत्यांची जाणीव होती. त्यांच्या मते जीवरूपी चैतन्य हे शरीराहून वेगळे असते. त्यानुसार चैतन्यरूपात असलेल्या जीवाचे स्वतंत्र अस्तित्व असते; मात्र त्याच्याशिवाय असलेल्या शरीराला अस्तित्व नसते.

vi. त्यांचे पूर्वजपूजा, पुनर्जन्म या गोष्टींवर आधारलेले तत्त्वज्ञान हे मृत्यू आणि मृत्यूनंतरचे जीवन यांसंबंधी विचार करणारे होते.

vii. संघम काळातील शिक्षण व्यापक होते. ते धर्म, जात या गोष्टींवर अवलंबून नव्हते. तसेच, ती एखाद्या समाजाची मिरासदारीही नव्हती.

viii. व्याकरण, काव्य, गणित, खगोलशास्त्र आणि ललित कला (संगीत, नृत्य, नाट्य, चित्रकला, शिल्प) आणि स्थापत्य हे अध्ययनाचे खास विषय होते.

### ४. ज्युडाइझममधील धार्मिक आचार पद्धती व ज्यू धर्मियांची स्थिती

**उत्तर:**

i. ज्यू धर्मीय लोक हे भारतात बाहेरून आलेल्या धर्मांच्या अनुयायांपैकी सर्वप्रथम होते असे मानले जाते.

ii. ते हिब्रू राजा सॉलोमन याच्यासोबत व्यापाराच्या उद्देशाने भारतात आले.

iii. कोचीमधील ज्यू धर्माचा स्वीकार करणाऱ्यांना 'कोची ज्यू' असे म्हटले जाऊ लागले. आजही कोचीच्या किल्ल्यामध्ये ज्यू सिनॅगॉग पाहायला मिळते.

iv. ज्यू समाजाची भारतातील लोकसंख्या कमी झाली आहे. मुंबई आणि मिझोरम मध्ये 'बेने इस्रायल ज्यू' या समाजाचे काही लोक आहेत.

v. ज्यू धर्मीय 'तोरॉ' या धर्मग्रंथातील नियमांचे पालन करतात. (ज्यात बायबलच्या 'जुना करार' या ग्रंथाचा समावेश आहे.)

vi. ज्यू धर्म हा एकेश्वरवादी आहे. पृथ्वीवर देवाच्या प्रेषिताचे आगमन अजून व्हायचे आहे असे ते मानतात.

vii. ज्यू धर्मियांमध्ये 'शबाथ' हा पवित्र विधी असतो. ज्यू धर्मियांचा मानवी इतिहासात अनन्वित छळ केला गेला आहे.

viii. शतकानुशतके ज्यू लोक भूमीहीन होते. या कारणाने ते वेगवेगळ्या खंडांत विखुरले गेले. त्यांना स्वत:चा देश इस्रायल मिळवण्यासाठी राजकीय संघर्षाचा सामना करावा लागला व यासाठी २० वे शतक उजाडावे लागले.

**आकलन हेतू स्पष्टीकरण**

एकेश्वरवाद म्हणजे एकच देव आहे ही श्रद्धा बाळगणे.

### ५. शीख धर्मियांची धार्मिक आचार पद्धती

**उत्तर:**

i. इ. स. १५ व्या शतकात शीख धर्माचा उदय झाला. गुरू नानक (इ. स. १४६९ – १५३९) यांनी शीख धर्माची स्थापना केली.

ii. शीख धर्माचा पंजाब (उत्तर भारत) मध्ये मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला.

iii. शिखांच्या दहा गुरूंनी केलेला उपदेश हा शीख धर्मियांच्या श्रद्धाप्रणालीचा पाया आहे. 'श्रीगुरूग्रंथसाहिब' हा शीखांचा पवित्र ग्रंथ आहे.

iv. या धर्माने जातीवर आधारित उच्चनीचता नाकारली. तसेच, धर्म आणि इतर सामाजिक क्षेत्रांत प्रत्येकाच्या समानतेचा पुरस्कार केला.

v. गुरूनानक यांनी जातिव्यवस्थेला, धार्मिक विधींचे स्तोम आणि मूर्तिपूजा यांना मनाई केली.

vi. लंगर म्हणजे पंजाबी भाषेत सार्वजनिक स्वयंपाकघर. १६ व्या शतकातील संस्थापक गुरूंनी लंगरला संस्थात्मक रूप दिले.

vii. लंगरचे हे संस्थात्मक स्वरूप दान आणि समानता या तत्त्वांचे एकमेवाद्वितीय असे प्रतीक आहे. या ठिकाणी जातपात, वय, स्त्री-पुरुष, सामाजिक प्रतिष्ठा असा कोणताही भेदभाव न करता येणाऱ्या प्रत्येकाला शाकाहारी भोजन पुरवले जाते.

viii. सर्व शीख गुरुद्वारांमध्ये लंगर असते. येथील स्वयंसेवक (सेवादार) गुरुद्वारात आलेल्यांशी सौजन्य, काळजी आणि अगत्यपूर्ण वर्तणूक करतात.

### *६. मध्ययुगीन काळातील भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान

**उत्तर:** इ.स. ६५०-१५०० हा भारतातील मध्ययुगीन काळ म्हणून ओळखला जातो.

i. मध्ययुगीन काळात स्त्रियांचे **सामाजिक स्थान अधिकच घसरणीला** लागले.

ii. मध्य आशियातून आलेल्या टोळ्यांची आक्रमणे आणि पुरोहित वर्गाच्या वर्चस्वाखाली समाजव्यवस्थेत काटेकोरपणे राबवले जाणारे कडक नियम हे घटक मुख्यत: या घसरणीला कारणीभूत होते.

iii. **स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर कडक निर्बंध** घालण्यात आले. त्यांना धर्मग्रंथांचे शिक्षण, तसेच लिहायला-वाचायला शिकवणे यांवरही बंदी घालण्यात आली आणि स्त्रीला जन्मभर पुरुषांवर अवलंबून राहणे भाग पडू लागले.

iv. फक्त राजघराण्यातील आणि क्वचित **उच्चवर्णीय स्त्रियांना** खासगीत लिहिण्यावाचण्याचे **शिक्षण देण्याची सोय** केली जात असे.

v. वैदिक काळात मान्यता असलेला **विधवा पुनर्विवाह** मध्ययुगीन काळात **पूर्णत: निषिद्ध** मानला गेला.

vi. स्त्रियांचा **कुटुंबाच्या संपत्तीमधील वाटा** याही काळात **नाकारला** गेला.

vii. बालविवाह, सती, पडदापद्धत, देवदासी परंपरा यांसारख्या **कुप्रथांनी स्त्रियांचे शोषण** होत राहिले.

viii. पितृसत्ताक एकत्र कुटुंबपद्धती, बहुपत्नीकत्व आणि बालविवाह यांसारख्या प्रथांमुळे स्त्रियांच्या **व्यक्तीविकासाच्या वाटा बंद** झाल्या.

**आकलन हेतू स्पष्टीकरण**

१. पितृप्रधान कुटुंबात सर्वांत वडीलधारी पुरुष हा कुटुंब प्रमुख मानला जातो. या कुटुंबप्रमुखाच्या हाती संपूर्ण कुटुंबाची सत्ता असते.

२. बहुपत्नीकत्व म्हणजे एकाच वेळेस एकाहून अधिक जोडीदाराशी विवाह करणे.

***७. पूर्व वैदिक काळातील शिक्षण व्यवस्था**

**उत्तर:**

**i. संस्कृत:** पूर्व वैदिक काळात वेद ग्रंथांचे अध्ययन-अध्यापन केले जात असे. हे वैदिक साहित्य संस्कृत भाषेत होते; मात्र संस्कृत ही लोकभाषा नव्हती.

**ii. शिक्षणाची व्याप्ती:** यजुर्वेदामध्ये स्त्रियांसह सर्व वर्गातील व्यक्तींना शिक्षणाचा हक्क मान्य केलेला आहे. तसेच, अथर्ववेदामध्येही प्रत्येक व्यक्तीला शिक्षण घेण्याचा अधिकार असल्याचे म्हटले आहे.

**iii. उपनयन आणि ब्रह्मचर्य:** वैदिक शिक्षणासाठी गुरुकुलात प्रवेश घेताना पहिल्या तीन वर्णातील विद्यार्थ्यांवर उपनयन संस्कार होणे आवश्यक होते. तसेच, त्यांचे गुरुकुलातील वास्तव्य असेपर्यंत ब्रह्मचर्याचे पालन करणे बंधनकारक होते.

**iv. मौखिक पठणपद्धती:** या पद्धतीने विद्यार्थी वेदांतील ज्ञान मुखोद्गत करत असत. मौखिक पठणात स्पष्ट आणि शुद्ध उच्चारणावर पूर्ण भर दिलेला असे.

**v. शिक्षणाची उद्दिष्टे:** तल्लख बुद्धी आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास ही शिक्षणाची उद्दिष्टे होती.

**vi. लेखन:** बहुतांश अभ्यासकांच्या मतानुसार या काळात लेखन कला ज्ञात नव्हती.

**vii. महत्त्वाची मूल्ये:** सत्याधारित आचरण, आपल्या कर्तव्याचे पालन (धर्म), गुरू आणि माता-पिता यांच्याप्रती निष्ठा, अतिथी सेवा, श्रद्धा आणि औदार्य या मूल्यांना महत्त्व होते.

**viii. अध्ययन क्षेत्र:** क्षत्रिय युद्धनीती आणि प्रशासन यांचे शिक्षण घेत. वैश्य उद्योग व्यवसायास उपयोगी शिक्षण घेत. शूद्रांना शेती आणि पशुपालनाचे शिक्षण दिले जात होते, तर ब्राह्मण बहुदा चारही वेदांवर प्रभुत्व प्राप्त करेपर्यंत गुरुकुलातच राहत असत.

**ix. ब्राह्मणांची भूमिका:** वेदकाळात ज्ञाननिर्मिती, ज्ञानसंवर्धन आणि पुढील पिढ्यांकडे ज्ञानाचे हस्तांतरण करणे हे कार्य ऋषी, मुनी आणि द्रष्ट्या व्यक्तींनी केले. त्यांना ब्राह्मण म्हणजे ब्रह्मतत्त्वाचे (सर्वोच्च) ज्ञान प्राप्त झालेले म्हणत.

**८. उत्तर वैदिक काळातील शिक्षण व्यवस्था**

**उत्तर:**

i. उत्तर वैदिक काळात **स्त्रियांना वेदांच्या शिक्षणाचा अधिकारही नाकारला** गेला.

ii. यज्ञसंस्थेला महत्त्व प्राप्त होऊन त्यासंबंधीचे साहित्य मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले. **यज्ञसंस्था** हा या काळातील वैदिक **शिक्षणाचा केंद्रबिंदू** होता.

iii. इसवीसनपूर्वीच्या पहिल्या सहस्त्रकात जनपदांचा उदय झाला. पुढे जनपदांच्या विस्तारवादी धोरणांमुळे **सत्तासंघर्ष निर्माण** होऊन जनपदांचे विघटन व अनेक प्रमुखांना सत्ता गमवावी लागली. यामुळे, **असुरक्षितताही निर्माण** झाली.

iv. या असुरक्षित वातावरणातून मोक्षप्राप्तीसाठी विरक्तीवर आधारलेला तापसी जीवनाचा मार्ग अनेकांनी स्वीकारला. हा मार्ग वेदकाळात माहीत असला तरी उपनिषदांमध्ये याविषयी सखोल चर्चा आढळते.

v. उपनिषदांच्या काळापर्यंत (इ. स. पू. सुमारे ६ वे शतक) तपस्वी व्यक्तींच्या उपदेशांतून, तसेच उपनिषदांवरील चर्चा आणि वादविवाद यांद्वारे **तापसी जीवनाच्या मार्गाचा प्रसार** झाला.

vi. भारताच्या पूर्व प्रदेशांत यज्ञापेक्षा मानव कल्याणावर भर देणाऱ्या आणि ईश्वराच्या अस्तित्वाचा विचार करणाऱ्या तत्त्वप्रणालींचा उदय झाला. यांतून **'श्रमण'** आणि **'परिव्राजक'** यांसारखे आध्यात्मिक नेतृत्व करणारे **पंथ** अस्तित्वात आले.

Sample Content

vii. या पंथांनी वेदप्रामाण्य आणि पुरोहितांचे वर्चस्व जुगारले; परंतु पुनर्जन्म, तसेच **कर्मसिद्धान्त** त्यांना **मान्य** होता. त्यांना यज्ञविधींत दिले जाणारे पशुबळीअमान्य होते.

viii. वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध यांच्या शिकवणीनुसार अहिंसा किंवा प्राणिमात्रांना इजा न करणे या गोष्टीला त्यांनी प्राधान्य दिले.

**९. बौद्ध शिक्षणपद्धती**

**उत्तर:**

i. बौद्ध भिक्खूंच्या वास्तव्यासाठी बांधलेल्या **विहारांतून** बौद्ध भिक्खूंना **शिक्षण प्रदान करणारी केंद्रे** तयार झाली.

ii. बौद्ध शिक्षणपद्धती ही बौद्ध संघाच्या व्यवस्थेशी बांधलेली होती. काही काळानंतर गौतम बुद्धांनी **स्त्रियांना भिक्खुणी** म्हणून या संघात **प्रवेश** देण्यास परवानगी दिली.

iii. **समता आणि बंधुता या तत्त्वांवर** आधारलेल्या बौद्ध संघात **प्रवेश** घेतलेल्या व्यक्तीची जात आणि सामाजिक ओळख संपूर्णपणे पुसली जात असे.

iv. विहारात धार्मिक शिक्षण दिले जात असे. वैदिक गुरुकुल पद्धतीप्रमाणेच बौद्ध संघातील गुरू आणि शिष्यांमध्ये घट्ट ऋणानुबंध निर्माण होत असे. शिष्याला आपल्या गुरू **('उपाझ्झाय' किंवा 'आचार्य')** जवळ राहून त्यांची सेवा करावी लागत असे.

v. भिक्खू आणि भिक्खुणी यांचे **स्वतंत्र संघ** असत. भिक्खुणी संघातील काही गुरुपदी पोहोचलेल्या ज्ञानी **भिक्खुणींना** आदराने **'थेरी'** असे म्हटले जाई. या संघात शिक्षण आणि सेवाभाव यांसाठी अनेक संधी उपलब्ध होत्या.

vi. आज आपण मानवतावाद म्हणू शकू अशा तत्त्वज्ञानाचा पाया असलेली बुद्धांची शिकवण होती. वैदिक काळातील शिक्षण पद्धती यज्ञसंस्थेभोवती, तर **बौद्ध शिक्षणपद्धती बौद्ध संघ आणि विहार यांभोवती गुंफलेली** होती. ह्युएन त्संग या चिनी भिक्खूच्या प्रवास वर्णनांमध्ये या गोष्टीचा उल्लेख आढळतो.

vii. **नालंदा व तक्षशिला ही विख्यात प्राचीन विद्यापीठे** आता अस्तित्वात नाहीत; मात्र तेथील विहारांत निवास करून बौद्ध धर्म व साहित्य यांचे अध्ययन व अध्यापन केले जाई. बौद्ध विहारांतून अध्ययन-अध्यापन करण्याची परंपरा आजतागायत सुरू आहे.

viii. बौद्ध शिक्षणपद्धतीचा इतिहास हा खऱ्या अर्थाने बौद्ध संघ आणि विहार यांचा इतिहास आहे. बौद्ध विहारांच्या उतरणीच्या काळात सुव्यवस्थित शिक्षणपद्धतीच्या ऱ्हासासही सुरुवात झाली. याच काळात भारतात इस्लामचे आगमन झाले. हा काळ मध्ययुगाच्या सुरुवातीचा काळ होता.

**१०. मध्ययुगीन काळातील स्त्री शिक्षण पद्धती**

**उत्तर:**

i. मध्ययुगीन काळात बदलत्या राजकीय परिस्थितीचा शिक्षण पद्धतीवर विपरीत परिणाम झाला.

ii. दिल्ली आणि आग्रा या राजधानीच्या शहरातील मुस्लीम शासकांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी काही विशेष प्रयत्न केले नाहीत.

iii. खेडी आणि शहरामध्ये वैयक्तिक पातळीवर विद्वान व्यक्तींकडून शिक्षण दिले जात असे. या शिक्षणाचे माध्यम संस्कृत, अरेबिक आणि पर्शियन होते.

iv. परंतु, असे शिक्षण हे फक्त संपन्न वर्ग, मुस्लीम उलेमा, तसेच ब्राह्मण आणि उच्चवर्णीय जातीचे लोक या विशिष्ट वर्गांपुरतेच मर्यादित होते.

v. मुलींचे शिक्षण हे पिता किंवा कुटुंबातील वडीलधाऱ्या पुरुषांच्या व्यक्तिगत निर्णयावर अवलंबून असे. मुस्लीम कुटुंबातील स्त्रियांना खासगी शिक्षकांकडून घरातच शिकण्याची परवानगी होती. या शिक्षकांना मौल्यवान वस्तू भेट म्हणून दिल्या जात.

vi. या उच्च वर्गातील लोकांची संख्या साहजिकच अत्यंत कमी असल्यामुळे मध्ययुगीन काळात मुलींच्या शिक्षणाची स्थिती दयनीय होती.

**११. हडप्पा आणि संघम काळातील समाजजीवन**

**उत्तर:**

**i. हडप्पा काळातील समाजजीवन:**

अ. हडप्पा संस्कृती ही तेथील सुनियोजित नगरे, बंदिस्त गटारे (जलनि:सरण), धान्य साठवणीची कोठारे यांसाठी ओळखली जाते. येथील महास्नानगृह हे तेथील सामूहिक जीवनाचे निदर्शक आहे.

ब. येथील उत्खननातून समोर आलेल्या पुराव्यानुसार तेथील समाजात कौशल्याधारित व्यावसायिकांचे वर्ग होते हे समजते; मात्र यात उच्चनीचतेची ताठर उतरंड नव्हती. या विभागणीत शेतकरी, कारागीर, व्यापारी, मासेमारी करणारे, धर्मगुरू, प्रशासक, कलाकार, विणकर इत्यादींचा समावेश होता.

**ii. संघम काळातील समाजजीवन:**

अ. संघम साहित्यात विविध जमाती आणि जातींच्या आलेल्या उल्लेखावरून त्यांच्या सहअस्तित्वाची कल्पना करता येते.

ब. संघम काळातील पुरोहित वर्गाचे समाजावर वर्चस्व नव्हते; तरीही त्यांना सल्लागार आणि समाज हितरक्षक म्हणून मान्यता होती.

क. गावोगावी फिरून पारंपरिक कथांचे गायन करणाऱ्या कलाकारांचा एक स्वतंत्र वर्ग होता. 'वेडर' या शिकारी आणि वाटमारी करणाऱ्या जमातीविषयी लोकांच्या मनात

दहशत होती. युद्ध कौशल्यावर निर्वाह करणारी 'मर्राकुडी' ही जमात स्वत:च्या स्वतंत्र परंपरा आणि श्रद्धा जोपासणारी होती. तसेच, मासेमारी करणारे, मिठाचे उत्पादन करणारे, विणकर, शेतकरी, मेंढपाळ, गोपालक यांसारख्या व्यावसायिकांना महत्त्वाचे स्थान होते.

**१२. गुप्त साम्राज्यातील समाजजीवन**

**उत्तर:**

i. गुप्त साम्राज्याचा काळ भारतातील अभिजात संस्कृतीचा काळ म्हणून ओळखला जातो. या काळात भारतीय समाजाने प्रत्येक क्षेत्रातील समृद्धी अनुभवली. कला, विज्ञान, राजनीती, धर्म, तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र अशा सर्व महत्त्वाच्या क्षेत्रांतील विकासाचा मूलभूत पाया घातला गेला. ज्यामुळे, भारतीय संस्कृतीची स्वत:ची खास ओळख निर्माण झाली.

ii. या काळात सामर्थ्यशाली गुप्त साम्राज्याने भारतावर राज्य केले. जेव्हा गुप्त सम्राट पहिला चंद्रगुप्त गादीवर आला तेव्हा त्याने अत्यंत शक्तिशाली सैन्याची उभारणी केली. तसेच, आपापसांत लढणाऱ्या नगरांना एकछत्री अंमलाखाली आणले.

iii. भारतीय उपखंडावर नियंत्रण मिळवत गुप्त साम्राज्याचा विस्तार होऊ लागला. गुप्त साम्राज्यातून देशोदेशी व्यापार चालत असे. तसेच, हे साम्राज्य कलानिर्मिती आणि बौद्धिक मंथनाचा केंद्रबिंदू बनले होते.

iv. याच काळात आर्यभट्टाने भूमिती, त्रिकोणमिती, विश्वोत्पत्तीशास्त्र अशा विषयांवर लेखन केले. तसेच, एका वर्षामध्ये ३६५-३५८ दिवस असतात हे गणित मांडले. पृथ्वी गोल असल्याचा सिद्धान्त त्याने मांडला. वराहमिहिराने खगोलशास्त्र आणि ज्योतिषशास्त्र या विषयांवर लेखन केले. धन्वंतरीने औषधोपचारांविषयी लेखन केले.

v. गुप्त काळातील समाजात शिक्षण, लेखन, वाचन यांना प्राधान्य दिले जात असे. समाजातील प्रत्येक इच्छुक व्यक्तीला शिक्षण घेणे शक्य होते.

vi. कालांतराने गुप्त साम्राज्याचा विस्तार इतका वाढला, की त्यांना या विस्तीर्ण भूभागावर नियंत्रण ठेवणे कठीण झाले. पुढे लहान राज्ये स्वतंत्र होऊन या साम्राज्याचे विघटन झाले. यामुळे, इ. स. ५५० च्या सुमारास मध्य आशियातील हूण टोळ्यांना भारतावर आक्रमण करून गुप्त साम्राज्याचा पराभव करणे शक्य झाले. इ. स. ६५० पर्यंत गुप्तांची सत्ता उतरणीला लागली.

## प्र.३. फरक स्पष्ट करा.

**१. ख्रिश्चन आणि इस्लाम धर्म**

**उत्तर:**

| क्र. | ख्रिश्चन | इस्लाम |
|---|---|---|
| i. | इसवीसनाच्या पहिल्या शतकात येशू ख्रिस्त यांचे शिष्य सेंट थॉमस यांनी दक्षिण भारतामधील मलबारच्या किनाऱ्यावर ख्रिश्चन धर्म आणला. वसाहतवादी काळात भारतामध्ये ख्रिश्चन धर्माचा लक्षणीय प्रभाव होता. | भारतात इस्लाम धर्माचे आगमन इसवीसनाच्या ६ व्या शतकात झाले असले तरी त्याचा प्रभाव ठळकपणे जाण्यास बराच काळ लागला. मध्ययुगीन काळात इस्लामच्या उपदेशाचा प्रसार दूरवर झाला. अनेक मुस्लीम सत्ताधिशांनी इस्लामचा प्रसार करण्याचे कार्य केले. |
| ii. | ख्रिश्चन धर्मात 'प्रेम' हे तत्त्व पायाभूत मानले जाते आणि सर्व ख्रिश्चन धर्मियांच्या मनात प्रेषित येशू ख्रिस्तांचा मृत्यू आणि पुनरुत्थान यांबद्दल विश्वास असतो. | इस्लाम धर्माच्या श्रद्धेचे पाच खांब आहेत, ज्यावर त्यांच्या श्रद्धा तसेच वर्तन ठरते. हे खांब म्हणजे, दृढ श्रद्धेची कबुली, नमाज पढणे, दान देणे, रमजानच्या पवित्र महिन्यात उपवास करणे, मक्केची यात्रा करणे. |
| iii. | येशू ख्रिस्ताचे अनुयायी 'ख्रिश्चन' म्हणून ओळखले जाऊ लागले. सेंट थॉमस यांचे मलबारमधील अनुयायी 'सिरियन ख्रिश्चन' म्हणून ओळखले जाऊ लागले. | मुस्लीम लोक इस्लाम धर्माचे पालन करतात. |
| iv. | ख्रिश्चन धर्म 'बायबल' ला सर्वस्व मानणारा आहे. | इस्लाम धर्मात 'पवित्र कुराण' हा ग्रंथ श्रद्धाप्रणालीचा स्रोत आहे. |

***२. पूर्व वैदिक काळातील आणि उत्तर वैदिक काळातील स्त्रियांची सामाजिक स्थिती**

**उत्तर:**

| क्र. | पूर्व वैदिक काळातील स्त्रियांची सामाजिक स्थिती | उत्तर वैदिक काळातील स्त्रियांची सामाजिक स्थिती |
|---|---|---|
| i. | वैदिक साहित्य आणि इतिहास संशोधनाच्या आधारे असे दिसून येते, की पूर्व वैदिक काळातील स्त्रियांचे सामाजिक स्थान तुलनेने अधिक उच्च दर्जाचे होते. | याकाळात जातिव्यवस्था आणि पुरोहित वर्ग यांचे समाजातील वर्चस्व खोलवर रूजले होते. जातिव्यवस्थेच्या ताठरपणामुळे विषमता वाढीस लागून स्त्रियांचा दर्जा अधिकच खालावत गेला. |

Sample Content

| | | |
|---|---|---|
| ii. | पूर्व वैदिक काळातील स्त्रियांना वेदांचे शिक्षण घेण्याची परवानगी होती. त्यांना उपनयन संस्काराचा अधिकार होता, ज्यामुळे त्यांना गुरुकुलात शिक्षण घेता येत असे. स्त्रियांना वेद आणि वेदांगे या दोन्हींचे शिक्षण दिले जात असे; मात्र नंतर स्त्रियांचे शिक्षण फक्त धार्मिक स्तवने आणि कविता यांच्यापुरते मर्यादित झाले. | या काळात स्त्रियांना शिक्षणाचा आधिकार नाकारण्यात आला. त्यामुळे, त्यांचा उपनयनाचा आणि गुरुकुलात शिक्षण घेण्याचा अधिकारही संपुष्टात आला. |
| iii. | स्त्रियांना आपल्या आयुष्याचा जोडीदार निवडण्याची मुभा या काळात होती. विवाह एक पवित्र संस्कार मानला जाई व विवाह मोडण्यास मान्यता नव्हती; मात्र विवाह केलाच पाहीजे अशी सक्तीही स्त्रियांवर नव्हती. एकपत्नीत्वाला प्राधान्य दिले जात असे. | उपनयना ऐवजी 'विवाह' हा एकमेव संस्कार आणि तोही बालविवाह स्त्रियांच्या वाट्याला आला. |
| iv. | स्त्रियांची भूमिका समाजोपयोगी आणि अर्थोत्पादक समजली जात होती. त्यांना त्या काळातील 'विदथ' (सामाजिक सभांमध्ये) सहभागी होण्याचा अधिकार होता. | स्त्रियांचे कार्यक्षेत्र फक्त घरगुती कामांपुरतेच बंदिस्त झाले. सामाजिक सभांमध्ये सहभागी होण्यास त्यांना बंदी घालण्यात आली. त्यांचे कुटुंबातील स्थान अगदी गौण दर्जाचे राहिले. |

***३. प्राचीन काळातील आणि वसाहतींच्या काळातील भारतीय शिक्षण पद्धती**

**उत्तर:**

| क्र. | प्राचीन काळातील भारतीय शिक्षण पद्धती | वसाहतींच्या काळातील भारतीय शिक्षण पद्धती |
|---|---|---|
| i. | यजुर्वेदामध्ये स्त्रियांसह सर्व वर्गातील व्यक्तींना शिक्षणाचा हक्क दिला गेला होता; मात्र उत्तर वैदिक काळात स्त्रियांना वेदांचे शिक्षण घेण्यास मनाई करण्यात आली. | ब्रिटिशांनी जी शिक्षण व्यवस्था उभारली तिचे भारतीय समाजावर दूरगामी परिणाम झाले. सर्व वंश, जाती, धर्माच्या मुला-मुलींना शाळा- महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्याची मुभा होती. |
| ii. | पूर्व वैदिक काळात शिक्षणाचे माध्यम संस्कृत होते; मात्र संस्कृत ही लोकभाषा नव्हती. | उच्च शालेय पातळीवरील शिक्षणाचे माध्यम इंग्रजी होते. त्यामुळे, आधुनिक शिक्षण घेतलेल्या लोकांमध्ये इंग्रजी ही संपर्क भाषा बनली. |
| iii. | वैदिक काळात गुरुगृही राहून शिक्षण घेण्याची पद्धती होती, तर बौद्ध शिक्षण पद्धती ही बौद्ध संघ आणि विहार यांच्याभोवती गुंफली गेली होती. विहारांमधून बौद्ध भिक्खुनी शिक्षण देणारी केंद्रे उभी राहिली. | इंडियन युनिव्हर्सिटीज ॲक्ट – १८५६ नुसार वसाहतकालीन भारतात कलकत्ता (कोलकाता), बॉम्बे (मुंबई ) आणि मद्रास (चेन्नई) येथे पहिल्या विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. |
| iv. | वैदिक काळात वैदिक ग्रंथांचे अध्ययन-अध्यापन केले जाई. क्षत्रिय प्रशासन व युद्धनीतीचे शिक्षण, वैश्य व्यवसायाच्या दृष्टीने उपयोगी असे शिक्षण, शूद्र शेती व पशुपालनाचे शिक्षण आणि ब्राह्मण चारही वेदांचे शिक्षण घेत. तर प्राचीनकालीन नालंदा व तक्षशिला विद्यापीठांतील विहारांमधून बौद्ध धर्म आणि साहित्य यांचे अध्ययन-अध्यापन केले जात असे. | या शिक्षण पद्धतीमधील विषय हे धर्मावर आधारित नव्हते, तर हे धर्मनिरपेक्ष होते. त्यात गणित, विज्ञान, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, इतिहास इत्यादी विषयांचा समावेश करण्यात आला होता. असे आधुनिक शिक्षण घेऊन एक नवीन बुद्धिवादी वर्ग उदयास आला जो जन्माने भारतीय होता; परंतु पाश्चात्त्य शिक्षणाच्या जडणघडणीतून तयार झालेला होता. |

## प्र.४. खाली दिलेल्या संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा.

**१. पुरातन वस्तू**

**उत्तर:**

i. प्राचीन संस्कृतीची ओळख पटवून देणाऱ्या मानवनिर्मित वस्तू म्हणजे पुरातन वस्तू होय.

**उदाहरण:** हत्यारे आणि अवजारे, भांडी, दागिने, कलावस्तू, शिल्पे, उत्खनित वस्तू, चित्रे, दफनस्थळे, समाधीस्थळे, नाणी, शस्त्रास्त्रे इत्यादी.

ii. पुरातत्त्वज्ञ आणि इतिहास संशोधकांनी शोधून काढलेल्या पुरातन वस्तू या प्राचीन काळातील समाजजीवन समजून घेण्याचा प्रमुख स्रोत आहे.

Sample content

iii. मानवी अस्थि आणि प्राण्यांची हाडे, जीवाश्म, प्राचीन स्थळांचे भौगोलिक स्थान या गोष्टीदेखील प्राचीनकालीन समाजजीवन समजून घेण्यास उपयुक्त ठरतात.

iv. या पुरातन वस्तूंच्या संशोधनातून दिसलेल्या त्यांच्या विविध पैलूंच्या आधारे प्राचीन संस्कृतीविषयक आकलन होते.

### २. लंगर

**उत्तर:**

i. पंजाबी भाषेत सार्वजनिक स्वयंपाक घराला 'लंगर' असे म्हटले जाते.

ii. १६ व्या शतकातील संस्थापक गुरूंनी लंगरला संस्थापक रूप दिले.

iii. लंगर हे दान आणि समानता या तत्त्वांचे एकमेवाद्‌वितीय प्रतीक आहे.

iv. येथे जातपात, वय, स्त्री-पुरुष, सामाजिक प्रतिष्ठा असे कोणतेही भेदभाव न ठेवता येणाऱ्या प्रत्येकाला शाकाहारी भोजन पुरवले जाते.

**उदाहरण:** सर्व शिख गुरुद्वारांतील लंगर

### *३. वर्ण

**उत्तर:**

i. वैदिक काळात वर्णव्यवस्था ही समाजातील वर्गवारीवर आधारित होती.

ii. व्यवसायानुसार वर्ण बदलण्याची लवचीकता दिली गेली होती.

iii. मात्र, वैदिक काळाच्या उत्तरार्धात यात बदल होत जाऊन अधिक कडक निर्बंध असलेली पावित्र्य व विटाळ या कल्पनांवर उभारलेली जातिव्यवस्थेची उतरंड प्रस्थापित होत गेली.

**उदाहरण:** ब्राह्मण (पुरोहित, शिक्षक, बुद्‌धिवादी), क्षत्रिय (राज्यकर्ते आणि योद्‌धे), वैश्य (व्यापारी, व्यावसायिक, शेतकरी) आणि शूद्र (हीन व हलक्या दर्जाची कामे) हे वर्ण.

iv. पहिले तीन वर्ण स्वत:ला उच्च म्हणवून घेऊ लागले. अन्न, पाणी यांचे प्राशन, पोशाख, व्यवसाय, पूजापद्धती, सामाजिक व्यवहार, प्रवास इत्यादी गोष्टींवर या कल्पनांचा पगडा होता.

### ४. पाश्चात्त्यीकरण (वेस्टर्नायझेशन)

**उत्तर:**

i. अनेक सुशिक्षित अभिजनांनी खाद्यसंस्कृती, पेहराव, सामाजिक रीतीभाती, वर्तणुकीचे संकेत, दृष्टिकोन, विश्वासप्रणाली, भाषा, खेळ आणि मनोरंजन इत्यादी बाबतींत ब्रिटिश जीवनपद्धतीचे अनुकरण केले.

ii. प्रख्यात समाजशास्त्रज्ञ डॉ. एम. एन. श्रीनिवास यांनी ब्रिटिश जीवनसरणीचे अनुकरण करण्याच्या या प्रक्रियेस (वेस्टर्नायझेशन) पाश्चात्त्यीकरण असे नाव दिले.

iii. अलातास यांनी पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावाचे चार प्रकारांमध्ये वर्गीकरण केले आहे.

अ. व्ययमूलक बदल – मूळ सांस्कृतिक लक्षणे हळूहळू कमी होत जाणे.

ब. वृद्‌धिमूलक – मूळ सांस्कृतिक लक्षणांमध्ये नवीन लक्षणांची भर पडणे.

क. पुष्टिमूलक – मूळ सांस्कृतिक लक्षणे अधिक समृद्ध होणे.

ड. संमिश्रता मूलक – जुन्या व नव्याच्या एकत्रीकरणातून नवीन लक्षणे विकसित होणे.

**उदाहरण:** इंग्रजी भाषेस शिक्षणाचे माध्यम म्हणून स्वीकारले गेले.

### *५. सामाजिक कायदे

**उत्तर:**

i. सामाजिक न्याय, समाज कल्याण, अपेक्षित सामाजिक सुधारणा, तसेच भारतीय समाजातील दुर्बल घटकांना संरक्षण देणे या गोष्टींशी हे कायदे संबंधित आहेत.

ii. फक्त कायदे करून समाजपरिवर्तन करणे शक्य नसते.


iii. मात्र, त्यामुळे अन्याय, दडपशाही, शोषण आणि शाब्दिक हिंसा या गोष्टींना बळी पडलेल्या व्यक्तींसाठी असे कायदे आशेचे किरण ठरतात.

iv. वसाहतकाळात सामाजिक सुधारणांचा प्रयत्न करणारे गट व संघ यांची संख्या वाढल्यामुळे प्रचलित दुष्ट प्रथांवर बंदी आणणारे कायदे अंमलात आणण्यासाठी ब्रिटिश सरकारवर दडपण आणणे त्यांना शक्य झाले.


**उदाहरण:** सती प्रतिबंधक कायदा (१८२९), इंडियन स्लेव्हरी कायदा (१८४३), कास्ट डिसेबिलिटी रिमुव्हल कायदा (१८५०), विधवा पुनर्विवाह कायदा (१८५६), स्त्री भ्रूणहत्या प्रतिबंध कायदा (१८७०), स्पेशल मॅरेज कायदा (१८७२), बालविवाहविरोधी कायदा (१९२९).

## प्र.५. (अ) पुढील संकल्पना चित्रे पूर्ण करा.

१. हिंदूच्या आयुष्याची उद्‌दिष्टे (पुरुषार्थ)





२. दिल्लीच्या इस्लामिक सत्ता





Sample Content


३. दिल्ली सुलतानशाहीतील सरंजामी पद्धतीची अधिकारांची उतरंड





४. हिंदू तत्वज्ञानातील परमेश्वर प्राप्तीचे मार्ग




५. अलातास यांनी केलेले पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रभावाचे वर्गीकरण




*६. स्वातंत्र्योत्तर भारतातील राज्यसंस्था




**उत्तरे:**

**[टीप:** विद्यार्थ्यांनी उत्तरांत अधिक पर्याय उपलब्ध असल्यास कोणतेही चार मुद्दे लिहिणे अपेक्षित आहे.**]**

१. i. धर्म: सत्याच्या मार्गावरून जात फळाची अपेक्षा न ठेवता आपले कर्तव्य करत राहाणे.
ii. अर्थ: परिश्रम करून विहित मार्गाने संपत्ती मिळवणे.
iii. काम: विहित मार्गाने इंद्रिय सुख किंवा शारीरिक सुखाची प्राप्ती करून घेणे.
iv. मोक्ष: जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्त होण्याचे आयुष्यातील परमोच्च ध्येय.

२. i. मामूलक घराणे किंवा स्लेव घराणे
ii. खिलजी घराणे
iii. तुघलक घराणे
iv. सय्यद घराणे
v. लोदी घराणे

३. i. सत्ताधारी वर्ग आणि अमीर उमराव (सुलतान आणि त्याचे नातेवाईक, हिंदू राजे आणि मुस्लीम नवाब)
ii. धर्मगुरू (उलेमा आणि ब्राह्मण)
iii. नागरी प्रजानन (श्रीमंत व्यापारी आणि कारागीर)
iv. शेतकरी (सरकारी तिजोरीत सारा जमा करणारे)

४. i. ज्ञानमार्ग (ज्ञान मिळवण्याचा मार्ग)
ii. भक्तिमार्ग (परमेश्वर चिंतनाचा मार्ग)
iii. राजमार्ग (ध्यानधारणेचा मार्ग)
iv. कर्ममार्ग (निष्काम बुद्धीने कर्तव्याचे पालन करण्याचा मार्ग)

५. i. व्ययमूलक बदल – (मूळ सांस्कृतिक लक्षणे हळूहळू घटत जाणे)
ii. वृद्धिमूलक बदल – (मूळ सांस्कृतिक लक्षणांमध्ये नवीन लक्षणांची भर पडणे).
iii. पुष्टिमूलक बदल – (मूळ सांस्कृतिक लक्षणांचे अधिक समृद्ध बनणे.)
iv. संमिश्रता मूलक बदल (जुन्या-नव्याच्या एकत्रीकरणातून नवीन लक्षणे विकसित होणे.)

६. i. लोकशाही तत्त्वांवर आधारित राजकीय यंत्रणा.
ii. सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे तत्त्व.
iii. समानतेचे तत्त्व
iv. पूर्वी अस्तित्वात असलेल्या संस्थानिक नवाब, राजेरजवाड्यांच्या अधिकारांना मान्यता नाही.
v. मुक्त आणि न्याय्य निवडणुकांचे तंत्र
vi. बहुपक्षीय पद्धत
vii. निवडणूक लढवण्याचा अधिकार
viii. संघराज्य राज्यव्यवस्था (केंद्र आणि राज्यसंघराज्याच्या अधीन असलेला प्रदेश)
ix. शासनाचे आधार: कार्यकारी मंडळ, कायदे मंडळ आणि न्यायव्यवस्था

**प्र.५. (ब) खालील विधाने चूक की बरोबर हे सांगून सकारण स्पष्ट करा.**

**१. प्राचीन काळातील लोकांचे समाजजीवन जाणून घेणे शक्य नाही.**

**उत्तर:** चूक.

**कारणे:**

i. प्राचीन काळातील समाजजीवन समजून घेण्यासाठी पुरातनवस्तू या महत्त्वाचा स्रोत ठरतात. पुरातत्त्वज्ञ आणि

Sample Content

इतिहास संशोधकांनी शोधून काढलेल्या या पुरातनवस्तू, तसेच प्रवासवर्णने, प्रत्यक्षदर्शींच्या नोंदी, चरित्रे, साहित्य, कोरलेल्या व लिखित राजाज्ञा, दरबारी दफ्तरे यांसारखे लिखित पुरावेही महत्त्वाचे स्रोत आहेत.

ii. मानवी अस्थि, प्राण्यांची हाडे, जीवाश्म, प्राचीन स्थळांचे भौगोलिक स्थान यांमुळेही प्राचीन काळातील समाजजीवन कसे असेल याचा अंदाज घेता येतो.

iii. अशा पद्धतीने केलेल्या संशोधनातून प्राचीन काळातील समाजजीवनाचे पुनर्रचित चित्र उभे करता येते. तसेच, प्राचीन संस्कृतीचे स्पष्ट आकलन होते.

***२. बौद्ध धर्म हा भारत व भारताबाहेरील अनेक भागांमध्ये पसरला गेला.**

**उत्तर:** बरोबर.

**कारणे:**

i. बौद्ध धर्माने समाजाच्या सर्व स्तरांतील व्यक्तींना प्रवेश दिला.

ii. बौद्ध धर्मातील नियम हे जैन धर्माच्या तुलनेत सौम्य होते. त्यामुळे, बौद्ध धर्माकडे मोठ्या संख्येने लोक आकृष्ट झाले.

iii. मौर्य सम्राट अशोकाच्या आश्रयामुळे याचा प्रसार भारताच्या सीमेपार फार दूरवर झाला. तिबेट, चीन, मंगोलिया, म्यानमार, जावा, सुमात्रा, श्रीलंका अशा अनेक प्रदेशांमध्ये बौद्ध धर्माचा प्रसार झाला. आजही या प्रदेशांतील लोकांच्या दृष्टीने भारत ही त्यांच्या धर्माच्या उगमाची भूमी म्हणून पवित्र आहे.

**३. अकबर बादशहाने नैतिक तर्कवादाच्या आधारावर नवीन धर्माची स्थापना केली.**

**उत्तर:** बरोबर.

**कारणे:**

i. अकबर बादशहाच्या राजवटीत त्याने नैतिक तर्कवादावर आधारित 'दिन-ई-इलाही' या नवीन धर्माची स्थापना केली. या धर्मात सर्व धर्मांच्या तत्त्वज्ञानाचे मंथन होते. यातूनच पुढे अकबर बादशहाने 'वैश्विक सहिष्णुता' या तत्त्वाच्या आधारावर या धर्माची उभारणी केली.

ii. ही धर्मपद्धती पुरोहित, धर्मगुरू, धार्मिक विधी, श्रद्धाप्रणाली आणि धर्मग्रंथविरहित अशी होती.

iii. या धर्मात विविध पवित्र ग्रंथांमधील शिकवणीचे सार होते.

**४. मध्ययुगीन काळात उदयास आलेल्या भक्ती चळवळींमुळे शीख धर्म पद्धतीत मोठ्या प्रमाणावर बदल घडून आले.**

**उत्तर:** चूक.

**कारणे:**

i. भेदाभेदाच्या पार्श्वभूमीवर मध्ययुगीन कालखंडामध्ये भक्ती तत्त्वाला प्राधान्य देणाऱ्या चळवळी उदयाला आल्या आणि हिंदू धर्म पद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाला.

ii. भक्ती पंथाने जातिव्यवस्था नाकारली. धार्मिक विधींच्या अतिरेकावर टीका करत यात साधेपणा आणण्यावर भर दिला.

iii. ईश्वरासमोर सर्वजण समान आहेत या तत्त्वाचा त्यांनी पुरस्कार केला. कीर्तन आणि अखंड नामस्मरण यांवर त्यांनी भर दिला.

**५. पूर्व वैदिक आणि उत्तर वैदिक काळात स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत काही समानता होत्या.**

**उत्तर:** बरोबर.

**कारणे:**

i. सामाजिक आणि कायदेशीर हक्कांच्या दृष्टीने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान नव्हते.

ii. स्त्रियांना स्थावर संपत्तीत हिस्सा मिळण्याचा अधिकार नव्हता. पितृप्रधान कुटुंबपद्धती अस्तित्वात असल्यामुळे वंशावळीचा वारसा पित्याकडून पुत्राकडे जात असे.

iii. जन्मापासून विवाहापर्यंत पित्याच्या, विवाहापासून पतीच्या आणि पतीच्या मृत्युनंतर पुत्राच्या आज्ञेत राहावे असा दंडक होता.

**आकलन हेतू स्पष्टीकरण**

पितृप्रधान कुटुंब हे पितृवांशिक असते. म्हणजे सत्ता, संपत्ती यांचे पित्याकडून पुत्राकडे हस्तांतरण होते.

**६. गुप्त साम्राज्याचा काळ व मध्ययुगीन काळात कलांची भरभराट झाली नाही.**

**उत्तर:** चूक.

**कारणे:**

i. गुप्त साम्राज्याचा काळ हे भारतीय इतिहासातील सुवर्णयुग मानले जाते. या काळात संगीत, चित्रकला यांसारख्या कला आणि वैद्यकीय, खगोलशास्त्र, भूमिती, साहित्य आणि इतर शास्त्रांनी भरीव योगदान दिले.

ii. विविध व्यवसायाधारित कौशल्ये प्रत्यक्ष काम करताना शिकाऊ उमेदवार आत्मसात करत असत. धनिक दानशूरांच्या आश्रयामुळे कला आणि उद्योग व्यवसायांची भरभराट झाली.

iii. पुढे मध्ययुगीन भारतात मुस्लीम राज्यकर्त्यांच्या आश्रयाखाली विविध कलांवर त्यांची अभिरुची कल्पना आणि निवड यांचा प्रभाव पडला.

Sample Content

***७. वसाहतवादयांच्या कायदयांचा भारतीय समाजावर लक्षणीय प्रभाव पडला.**

**उत्तर:** बरोबर.

**कारणे**

i. ब्रिटिशांनी केलेल्या 'इंडियन युनिव्हर्सिटीज ॲक्ट १८५६' अन्वये भारतातील पहिल्या विद्यापीठांची कलकत्ता (कोलकाता), बॉम्बे (मुंबई) आणि मद्रास (चेन्नई) येथे स्थापना झाली. तसेच' इंडियन कॉन्सिल ॲक्ट', 'इंडियन हायकोर्ट ॲक्ट', 'इंडियन सिव्हिल ॲक्ट' १८६१ यांमुळे भारतातील कार्यकारी, कायदेविषयक आणि न्यायविषयक प्रशासन पद्धतीमध्ये महत्त्वाचे बदल घडून आले.

ii. वसाहतकालीन सामाजिक कायदे हे सामाजिक न्याय, समाजकल्याण, अपेक्षित सामाजिक सुधारणा आणि भारतीय समाजातील दुर्बल घटकांना संरक्षण देणे या गोष्टीसंबंधित आहेत.

iii. ब्रिटिशांनी केलेल्या सती प्रतिबंधक कायदा (१८२९), इंडियन स्लेव्हरी कायदा (१८४३), कास्ट डिसएबिलिटी रिमुव्हल कायदा (१८५०), विधवा पुनर्विवाह कायदा (१८५६), स्त्री भ्रूणहत्या प्रतिबंध कायदा (१८७०), स्पेशल मॅरेज कायदा (१८७२) व बालविवाहविरोधी कायदा (१९२९) यांमुळे समाजातील प्रचलित दुष्ट प्रथांवर बंदी आणणे शक्य झाले.

**८. वसाहतकाळात दळणवळण आणि संपर्क क्षेत्रात सुधारणा झाल्या.**

**उत्तर:** बरोबर.

**कारणे:**

i. वसाहतकाळात भारतभर रेल्वे आणि रस्ते यांची उभारणी करण्यात आली. तसेच टपाल, तार अशा सोयी करण्यात आल्या.

ii. यामुळे, देशातील कानाकोपऱ्यांतील लोकांपर्यंत आणि स्रोतांपर्यंत पोहोचणे सुलभ झाले.

iii. १८६९ मध्ये व्यापारास प्रोत्साहन देण्यासाठी सुएझ कालवा खुला करण्यात आला. वाहतूक आणि संपर्क साधनांमध्ये झालेल्या या सुधारणांमुळे भारतीय कच्च्या मालासाठी अधिक बाजारपेठा उपलब्ध झाल्या.

**९. १८ व्या शतकात महात्मा फुले यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादाची चळवळ उदयास आली.**

**उत्तर:** चूक.

**कारणे:**

i. शिक्षित गटांकडून इंग्रजी भाषेच्या वाढत्या वापरामुळे राष्ट्रवादाचा प्रसार आणि प्रचार होऊ लागला. यामुळे, राष्ट्रवादाच्या चळवळीस चालना मिळाली.

ii. भारतीयांच्या मनात परकीय ब्रिटिश सत्तेच्या विरुद्ध असंतोषाची भावना निर्माण झाली. परिणामी, भारतीय स्वातंत्र्यलढ्यास चालना मिळाली.

iii. १९ व्या शतकात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा उदय आणि महात्मा गांधींनी स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व स्वीकारणे या गोष्टी घडून आल्या.

**१०. स्वातंत्र्योत्तर भारतात शिक्षण पद्धतीत सुधारणा घडून आल्या.**

**उत्तर:** बरोबर.

**कारणे:**

i. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात अंगणवाडी, शाळा, विद्यापीठे, मानद विद्यापीठे, स्वायत्त संस्था, आय. आय. टी., आय. आय. एम., व्यावसायिक शिक्षण संस्था, मुक्त शिक्षण, ऑनलाइन शिक्षण, स्वअध्ययनाच्या संधी इत्यादींच्या संख्येत प्रचंड वाढ झाली.

ii. या शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्यांची संख्या प्रमाणाबाहेर वाढलेली आहे. तसेच, शिक्षकांच्या संख्येतही वाढ झालेली आहे.

iii. वेळोवेळी काही विशिष्ट अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेण्याची लाट आल्याचे दिसून येते.

iv. २०१९ मध्ये शिक्षणपद्धतीमध्ये सर्व स्तरांवर परिवर्तन घडवून आणण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणासंदर्भात मसुदा तयार करण्यात आला.

## प्र.६. आपले मत नोंदवा.

**१. हडप्पा संस्कृतीत स्वत:ची अशी धार्मिक श्रद्धाप्रणाली आणि आचार पद्धती अस्तित्वात होती.**

**उत्तर:**

i. हडप्पा संस्कृतीच्या उत्खननांमधून मातीच्या पुरुष व स्त्री देवतांच्या मूर्ती मिळालेल्या आहेत; परंतु त्या काळातील देवालये किंवा मूर्तिपूजा यांबाबत ठोस पुरावा मिळालेला नाही.

ii. सूर्य, पर्जन्य, जल, वादळ अशा नैसर्गिक घटकांना देवतास्वरूप मानून त्यांची प्रार्थना केली जात असे. कालांतराने इंद्र, अग्नी, सूर्य, यम यांसारख्या देवांना महत्त्व प्राप्त झाले.

iii. स्थानिक अवैदिक जमातींच्या स्वत:च्या श्रद्धाप्रणाली होत्या. त्या कोणत्याही विशिष्ट धर्माच्या नावाने ओळखल्या जात नव्हत्या किंवा त्यांचे काही धार्मिक ग्रंथही नव्हते.

iv. त्यामुळे, त्यांच्या श्रद्धाप्रणालींची माहिती फक्त प्राचीन धर्मग्रंथातील संदर्भांच्या आधारावर मध्ययुगीन नोंदी आणि वसाहतकाळातल्या समूहविशिष्ट वर्णनांवरून मिळू शकते.

Sample Content

***२. जैन आणि बौद्ध धर्मांमुळे लोकांमध्ये आशा निर्माण झाली.**

**उत्तर:**

i. जैन आणि बौद्ध धर्माने धार्मिक यज्ञ विधींचे स्तोम, पशुबळीप्रथा, सामाजिक उतरंड यांना विरोध केल्यामुळे लोकांच्या मनात आशा निर्माण झाली.

ii. जैन व बौद्ध धर्माने सर्व स्तरांतील व्यक्तींना या धर्मांत प्रवेश दिला.

iii. मोक्षाचा हक्क त्यामुळे समाजातील विशिष्ट वर्गापुरताच मर्यादित राहिला नाही.

iv. जैन आणि बौद्ध या दोन्ही धर्मांकडे प्रस्थापित धर्मपद्धतीला विरोध करणारे बंडखोर धर्म म्हणून पाहिले जाते. या दोन्ही धर्मांना नास्तिक असेही म्हटले जाते.

***३. समाजसुधारणेच्या चळवळी २१ व्या शतकातही सुरू आहेत.**

**उत्तर:**

i. समाजसुधारणेच्या चळवळी या दडपशाही आणि प्रतिगामी प्रथा नष्ट करण्यासाठी कार्य करत असतात.

ii. शैक्षणिक संशोधन, शास्त्रीय अभ्यास, प्रसारमाध्यमे, आंदोलक गट आणि विशिष्ट विषय घेऊन त्या संबंधित प्रत्यक्षात काम करणारे गट यांसारख्या माध्यमांतून मिळालेल्या माहितीद्वारे लोकांच्या समस्या अधोरेखित केल्या जातात.

iii. या समस्या दूर करण्यासाठी समाजसुधारणा चळवळी सुरू केली जाते.
उदाहरणार्थ, अलीकडच्याच काळात एलजीबीटी चळवळीमुळे सर्वोच्च न्यायालयाने बहुलैंगिकता हा गुन्हा नाही असा निवाडा केला.
तसेच, ट्रान्सजेंडर पर्सन्स् कायदा हादेखील चळवळीचे फलित आहे.

iv. समाज हा सातत्याने बदलतच असतो. या बदलाच्या प्रक्रियेमध्ये सामाजिकदृष्ट्या घातक प्रथा निर्माण होऊ शकतात आणि त्यांना हाताळता येणेही आवश्यक असते.

v. आजच्या काळातही समाजातील विविध घटकांच्या कल्याणासाठी अशा समाजसुधारणा चळवळींची गरज निश्चितच आहे.

**प्र.७. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

***१. पुढील मुद्द्यांच्या आधारे आजचा भारतीय समाज कसा बदलत गेला आहे, याची उदाहरणासहित चर्चा करा.**

**i. इंग्रजी भाषा हे शिक्षणाचे माध्यम**

**ii. मतदानासाठी असलेली वयोमर्यादा कमी होणे**

**iii. सामाजिक कायदे**

**iv. वाहतूक आणि संपर्क (दळणवळण)**

**उत्तर:**

i. इंग्रजी भाषा ही शिक्षणाचे माध्यम झाल्याने **इंग्रजी भाषेचे** संपर्काची भाषा म्हणून **महत्त्व वाढले.** यामुळे, मातृभाषेचा कमी वापर केला जाऊ लागला. पुढे इंग्रजी बोलता येणे हे उच्च प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाऊ लागले. उदा. इंग्रजी न बोलता येणारे किंवा प्रादेशिक माध्यमातील व्यक्तींना समाजात कमी लेखले जाऊ लागले.

ii. मतदानासाठी असलेली वयाची मर्यादा कमी केल्यामुळे जास्तीत जास्त लोकसंख्येला मतदान करणे शक्य होते; ज्यामुळे **लोकशाही निर्णयप्रक्रियेत जास्तीत जास्त लोक सहभागी होऊ शकतात.** उदा. १८ वर्षे पूर्ण केलेली कोणतीही व्यक्ती स्थानिक, प्रादेशिक आणि राज्यपातळीवर विविध निवडणुकांमध्ये मतदान करू शकते.



**ज्ञानगुरू**

भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी १९८८ मध्ये मतदानाचे वय २१ वर्षांवरून १८ वर्षे इतके कमी केले.

iii. सामाजिक कायद्यांमुळे **सामाजिक कल्याण सुरक्षित ठेवणे शक्य** होते. उदा. हिंसामुक्त जीवन हा स्त्रीचा हक्क आहे. कौटुंबिक हिंसाचार तिच्या मानवी अधिकार व सर्वांगीण विकासाच्या आड येणारा गंभीर विषय आहे. म्हणूनच, हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण करण्यासाठी, तसेच ज्या स्त्रिया अशा प्रकारच्या हिंसाचाराला बळी पडल्या आहेत त्यांना त्यांच्या अधिकाराचा वापर सहज शक्य व्हावा आणि लवकरात लवकर त्यांना न्याय मिळावा याकरता घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम कायदा २००५ करण्यात आला.

iv. वाहतूक आणि संपर्क साधनांमुळे संपर्क अतिशय सहज झाला आहे. कितीही दूरच्या प्रदेशापर्यंत आधुनिक वाहतूक आणि संपर्क साधनांच्या सोयींमुळे पोहोचणे शक्य होते. उदा. उत्पादक आपली उत्पादने संपूर्ण जगभरात विकू शकतात. अशा कार्यक्षम वाहतूक आणि संपर्क सुविधांमुळे संपूर्ण जगाची एकसंघ बाजारपेठ तयार झाली आहे.

Sample Content

**२. जैन आणि बौद्ध धर्म यांतील साम्य व फरक यांच्या आधारे तुलना करा.**

**उत्तर:**

| क्र. | जैन धर्म | बौद्ध धर्म |
|---|---|---|
| | **साम्य** | |
| i. | वर्धमान महावीर व गौतम बुद्ध यांनी पुरोहितांच्या वर्चस्वाला विरोध करणाऱ्या नवीन तत्त्वज्ञानाची शिकवण लोकांना दिली. त्यांचे तत्त्वज्ञान भारतीय परंपरेत जैन धर्म आणि बौद्ध धर्म म्हणून रूढ झाले. | |
| ii. | वर्धमान महावीर यांनी त्यांच्या शिकवणीतून 'देव' या संकल्पनेचा समावेश केलेला नाही, तर त्यांनी 'निर्वाण' या तत्त्वास महत्त्व दिले. जैन धर्माप्रमाणेच गौतम बुद्धांनीही आपल्या उपदेशांत 'देव' या संकल्पनेचा समावेश केलेला नाही. | |
| iii. | प्रस्थापित धर्माला विरोध करणारे बंडखोर धर्म म्हणून जैन व बौद्ध धर्माकडे पाहिले जाते. | |
| iv. | धार्मिक शिक्षण देणारे संघ जैन आणि बौद्ध धर्मांत आढळतात. | |
| v. | महावीर आणि बुद्ध यांच्या निर्वाणानंतर या दोन्ही धर्मांच्या उपदेशाचा प्रसार कमी झाला. पुढे सुमारे बाराशे वर्षांच्या कालखंडात कोणताही नवीन आणि प्रभावी धर्म उदयाला आला नाही. | |
| vi. | कालांतराने दोन्ही धर्मांमध्ये स्वतंत्र पंथ निर्माण झाले. | |
| | **फरक** | |
| i. | हिंदू धर्माप्रमाणे जैन परंपराही कर्म सिद्धान्त मानते; मात्र 'अहिंसा' आणि 'तपस' या दोन तत्त्वांना जैन धर्मात अत्यंत महत्त्व दिले जाते. | बौद्ध धर्मात व्यक्तीच्या नैतिक उन्नती आणि त्यावर आधारित जीवनपद्धतीस महत्त्व देण्यात आले होते. दानवृत्ती, स्वार्थत्याग, संयम, विचार आणि कृतीमधील अहिंसा हे गुण बौद्ध जीवनपद्धतीत आचरणात आणले जातात. |
| ii. | महावीरांनी आपली शिकवण अर्धमागधी या लोकभाषेतून दिली. | बौद्ध धर्माचे 'तिपिटक' (त्रिपिटक) हे पवित्र ग्रंथ 'पाली' या लोकभाषेत लिहिलेले आहेत. |
| iii. | जैन परंपरेत व्रतस्थ जीवन पद्धतीच्या दैनंदिन नियमांना महत्त्व होते. | बुद्धांनी चार आर्यसत्ये आणि अष्टांग मार्ग यांवर आधारित 'मध्यम' मार्गाचा उपदेश केला. |
| iv. | कालांतराने जैन धर्मात दिगंबर (आकाश हेच वस्त्र) आणि श्वेतांबर (श्वेत वस्त्र परिधान करणारे) असे दोन पंथ निर्माण झाले. | कालांतराने बौद्ध धर्मांत हीनयान (छोटे वाहन), महायान (मोठे वाहन) असे स्वतंत्र पंथ निर्माण झाले. वज्रयान हा तिसरा पंथ इसवीसनाच्या ८ व्या शतकात उदयास आला. |
| v. | जैन धर्माचे नियम बौद्ध धर्माच्या तुलनेत ताठर होते. | बौद्ध धर्माचे नियम काहीसे सौम्य असल्यामुळे भारताबाहेरही या धर्माचा प्रसार झाला. |
| vi. | अधिकचा मुद्दा:<br>जैन धर्माचा उगम हा अत्यंत प्राचीन काळातील आहे असे मानले जाते. जैन परंपरेत एकूण २४ तीर्थंकर होऊन गेले. यांपैकी वर्धमान महावीर हे चोविसावे म्हणजे शेवटचे तीर्थंकर होते. | अधिकचा मुद्दा:<br>गौतम बुद्धांनी भिक्खू संघाची स्थापना केली व या संघाला अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले. व्यक्तिगत आणि सामाजिक पुनरुत्थानासाठी आवश्यक अशी पार्श्वभूमी तयार करणे हे महत्त्वाचे कार्य भिक्खूसंघाने केले. |

Sample Content

**३. मध्ययुगीन काळातील पारशी धर्मातील धार्मिक आचार पद्धती आणि श्रद्धाप्रणाली यांवर चर्चा करा.**

**उत्तर:** मध्ययुगीन काळात (इ. स. ६५० –१५००) भारतामध्ये काही धर्म बाहेरून आले. यांत ज्युडाइझम, ख्रिश्चन, इस्लाम आणि बऱ्याच कालावधीने आलेल्या पारशी धर्माचा समावेश आहे.

i. जगातील प्राचीन धर्मांपैकी एक व आजतागायत टिकून राहिलेला धर्म म्हणून पारशी धर्माची ओळख आहे.

ii. पारशी धर्माचे मूळ मध्य पूर्वेच्या प्रदेशात आहे.

iii. धार्मिक छळाच्या कारणावरून या धर्माच्या अनुयायांनी स्थलांतर केले व ते भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर आजच्या गुजरातमध्ये पोहोचले आणि तेथील संस्कृतीशी एकरूप झाले.

iv. या धर्माच्या चांगले आणि वाईट अशा ध्रुवीय संकल्पना आहेत.

v. या धर्माचा पवित्र ग्रंथ 'अवेस्ता' हा आहे.

vi. बाहेरून आलेल्या धर्मांपैकी फक्त पारशी धर्मीय लोकच हे समाजाबाहेरील व्यक्तीशी सहसा लग्न करत नाहीत. या धर्मातील लोक बाहेरील व्यक्तींना आपल्या धर्मात येण्यास परवानगी देत नाहीत.

vii. तसेच, त्यांच्या अग्यारीत पारशी व्यक्तींखेरीज इतरांना प्रवेश करण्यास बंदी असते.

**४. जैन व बौद्ध धर्मातील स्त्रियांचे सामाजिक स्थान यावर चर्चा करा.**

**उत्तर: जैन धर्मातील स्त्रियांचे स्थान:**

i. स्त्रियांनाही निर्वाणप्राप्ती होऊ शकते असे जैन धर्म मानतो.

ii. श्वेतांबर पंथात अनेक आदरणीय स्त्रियांच्या कामगिरीची दखल घेतलेली आहे. जैन धर्मातील 'सोळा सती' (१६ सत्त्वशील स्त्रिया) या सर्व स्त्रियांसाठी आदर्शवत आणि अनुकरणीय मानलेल्या आहेत.

iii. मात्र, जैन संघात साध्वींसाठी असलेले आचरणांचे नियम हे मुनींसाठी असलेल्या नियमांपेक्षा कठीण असतात.

iv. त्याचबरोबर तीर्थंकरांच्या मातांना अत्यंत आदराची वागणूक देण्यात येते, तसेच त्यांना देवतास्वरूप मानून पूजलेही जाते.

v. अनेक जैन साध्वींनी सती प्रथा, दासी प्रथा आणि पशुबळी यांसारख्या कुप्रथा नष्ट करण्यासाठी योगदान दिलेले आहे.

vi. अनेक साध्वी आणि आदर्श स्त्रियांचे जैन साहित्यातून, तसेच मौखिक परंपरांमधून गुणगान केलेले आढळते.

**बौद्ध धर्मातील स्त्रियांचे स्थान:**

i. गौतम बुद्धांनी बौद्ध संघात स्त्रियांना प्रवेश, तसेच तेथील कार्यात पूर्ण सहभाग घेण्यास मान्यता दिली.

ii. बौद्ध धर्मातील विविध पंथ आणि परंपरा यांमध्ये स्त्रियांच्या आध्यात्मिक उन्नतीबाबत वेगवेगळे दृष्टिकोन आहेत.

iii. वृद्धत्व, आजार आणि मृत्यू या गोष्टींना कोणीच अपवाद नसल्याने बौद्ध धर्म स्त्री आणि पुरूष असा भेद मानत नाही.

iv. सुरुवातीच्या बौद्ध ग्रंथांमध्ये स्त्रियांना निर्वाणप्राप्ती होऊ शकते हे जरी मान्य केले असले तरी 'विनय पिटक' या ग्रंथात मात्र स्त्री बुद्ध होण्याची शक्यता स्पष्टपणे नाकारलेली आहे; परंतु स्त्रियांना दीक्षा घेऊन भिक्खुणी म्हणून बौद्ध संघात प्रवेश घेण्यास परवानगी आहे.

v. गौतम बुद्धांनी मुलीचा जन्म हा निराशाजनक समजू नये असे म्हटलेले आहे.

vi. बुद्धांनी स्त्रियांच्या समाजोपयोगी भूमिकेला महत्त्व दिले.

vii. स्त्रियांनी आपल्या पतीच्या व्यवसायाचे ज्ञान संपादन करून त्याच्या अनुपस्थितीत व्यवसाय सांभाळणे अपेक्षित असे.

viii. गौतम बुद्धांना स्त्रियांच्या व्यवहारक्षमतेची जाणीव होती. त्यामुळे, त्यांनी भिक्खुणी संघातील स्त्रियांना अनेक जबाबदाऱ्या पार पाडण्यास दिल्या होत्या. धम्मदिन्ना, खेमा आणि उप्पलवन्ना या काही नावाजलेल्या भिक्खुणी होत.

**५. इस्लामिक शिक्षण पद्धतीवर चर्चा करा.**

**उत्तर:**

i. मध्ययुगातील इस्लामिक शिक्षण हे पवित्र कुराणला केंद्रस्थानी ठेवणारे होते. कुराण, हदिथ आणि इतर शास्त्रांचे अध्ययन करण्याकरता साक्षर असणे गरजेचे होते.

ii. इस्लामिक शिक्षण पद्धतीत इस्लामवर श्रद्धा असणाऱ्या सर्व वर्गांतील व्यक्तींना प्रवेश होता.

iii. पैगंबर मुहम्मद यांनी सर्व अनुयायांना ज्ञान मिळवण्याचा आदेश दिला; मात्र त्यासाठी वैदिक शिक्षण पद्धतींप्रमाणे कडक शिस्त किंवा सर्वसंगपरित्याग या गोष्टी बंधनकारक नव्हत्या.

iv. शिक्षण हे मक्ताब (प्राथमिक शिक्षणासाठी), मदरसा (उच्च शिक्षण देणारी संस्था), खानक्वा (अल्लाहच्या परमोच्च तत्त्वांचे शिक्षण देणारी सुफी केंद्रे) या तीन मूलभूत संस्थांद्वारे दिले जात असे:

**अ. मक्ताब:**

१. वयाच्या चौथ्या वर्षी मक्ताबमध्ये प्रवेश दिला जाई. त्यासाठी एक धार्मिक विधी पार पाडला जात असे. वाचन, पठण, लेखन आणि अंकगणित असे अध्ययनाचे स्वरूप असे.

२. लिपी आणि लेखन कला विकसित करण्यासाठी अनेक तास सराव करून घेतला जात असे.

३. साधारण वयाच्या सातव्या वर्षी कुराणच्या अध्ययनास सुरुवात केली जात असे.

**ब. मदरसा:**

१. मदरसामध्ये कुराण आणि त्याचे स्पष्टीकरण करणाऱ्या ग्रंथांचे वाचन आणि त्यांचा सखोल अर्थ समजावून घेण्यावर भर दिला जात असे.

२. याचबरोबर शेती, हिशोब, ज्योतिष, खगोलशास्त्र, इतिहास, भूगोल, गणित इस्लाममधील कायदे, न्यायव्यवस्था, तसेच प्रशासन असे व्यवहारोपयोगी विषयही शिकवले जात.

३. तसेच, अरेबिक आणि पर्शियन भाषाही शिकवल्या जात.

४. विद्वान अबुल फज्ल यांनी नमूद केल्याप्रमाणे अकबर बादशाह याने मदरशात शिकण्यास येणाऱ्या हिंदू विद्यार्थ्यांसाठी संस्कृत भाषा, तसेच उपनिषदे यांच्या अध्ययनाची सोयही केली होती.

५. शिक्षण हे तत्कालीन काळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक गरजांनुसार देण्याची व्यवस्था होती.

६. विद्यार्थ्यांना आपल्या आवडीनुसार आणि त्यांच्या आयुष्यातील ध्येयानुसार विषय निवडण्याची मुभा होती.

Sample Content

७. मदरशातील शिक्षण संपल्यानंतर खासगी शिक्षकांकडून शिक्षण सुरू ठेवणे शक्य होते. (उदा. अब्दुल कादिर बदायूंनी, अबुल फज्ल, फैझी) या मदरशांमध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांची राहण्याची सोय केलेली असे. त्यासाठी राज्यसत्ता आणि मुस्लीम अमीर-उमरावांकडून आर्थिक साहाय्य दिले जात असे.

८. या दृष्टिकोनातून मदरशांची तुलना बौद्धविहार आणि दक्षिण भारतातील मंदिरांमधील (इ. स. सातवे शतक) विद्याकेंद्रांशी करता येईल.

**क. खानक्वा:**

१. खानक्वांची तुलना मध्ययुगीन युरोपातील ख्रिश्चन मठांशी (मोनॅस्टरी) करता येईल.

२. सहसा लोकांमध्ये पूजनीय असणाऱ्या सुफी संतांच्या दर्ग्याशी निगडित खानक्वा या संस्था असत.

**६. प्राचीन काळातील नागरीकरण यावर चर्चा करा.**

**उत्तर:**

i. पुरातत्त्वीय पुराव्यांवरून **हडप्पा संस्कृतीत** पूर्वनियोजित संस्कृती अस्तित्वात होती हे दिसून येते आणि तेथील जीवनप्रणालीला **पहिली नागरी संस्कृती** असे म्हटले जाते.

ii. हडप्पा संस्कृतीतील नागरी जीवन हे विकसित स्वरूपाचे होते. तेथील काही घरांमध्ये विहिरी आणि स्नानगृहे होती. तेथील नगरांमध्ये बंदिस्त आणि भूमिगत गटारे होती. सामाजिक परिस्थिती एखाद्या प्रगत नागरी संस्कृतीसारखीच होती. हडप्पा संस्कृतीच्या प्रगत व्यापाराचे उल्लेख सुमेरियन इष्टिकालेखांमध्ये केलेले आढळतात,

iii. उत्तर वैदिक काळाच्या उत्तरार्धात भटके पशुपालक असलेले आर्य लोक पंजाबपासून पूर्वेकडे गंगा नदीच्या खोऱ्यापर्यंत पसरले गेले. त्या प्रदेशात त्यांनी जंगलतोड करून तेथील जमिनीवर शेतीची लागवड केली.

iv. **इ. स. पू. ५०० ते २०० वर्षे** हा कालखंड **'दुसऱ्या नागरीकरणाचा' काळ** म्हणून ओळखला जातो. ज्यामुळे, गंगेच्या मध्य खोऱ्यात अनेक मोठ-मोठी शहरे उदयाला आली.

v. मगध महाजनपदाच्या राजांनी या प्रदेशात प्रभुत्व प्रस्थापित केले. त्यातूनच मौर्य साम्राज्याच्या उदयाची पार्श्वभूमी तयार झाली. हा काळ पूर्व वैदिक संस्कृतीहून भिन्न वैशिष्ट्ये असणाऱ्या संस्कृतीचा काळ होता.

vi. अनेक छोट्या जनपदांच्या एकत्रीकरणातून महाजनपदे निर्माण झाली. त्यातील काहींमध्ये राजेशाही सत्ता, तर काहींमध्ये गणराज्य पद्धतीची राज्यव्यवस्था होती. या महाजनपदांनी अफगाणिस्तान ते बंगालपर्यंत आणि महाराष्ट्राचा काही भाग व्यापला होता.

vii. हडप्पानंतर या कालखंडात पुन्हा एकदा मोठे नागरीकरण उदयाला आले. भारतातील चकाकीदार काळी भांडी (नॉर्दन ब्लॅक पॉलिश्ड् वेअर) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संस्कृतीच्या स्थळांच्या उत्खननातून याचा पुरातत्त्वीय पुरावा मिळालेला आहे.

viii. या काळातील नागरी, सामाजिक-राजकीय जीवनाची माहिती जैन, बौद्ध आणि संस्कृत सूत्रवाङ्मयातून मिळते.

ix. याच काळात नाणेयुगास (धातूच्या चलनी नाण्यांची) सुरुवात झाली. राजधानींची शहरे सत्तेची आणि व्यापारी केंद्रे बनली. त्यामुळे, या शहरांमध्ये कारागीर आणि व्यापारी श्रेणी प्रस्थापित झाल्या.

x. अंतर्गत आणि लांबच्या व्यापारासाठी पूर्व आणि पश्चिमेकडील प्रदेशांना जोडणाऱ्या हमरस्त्यांचे जाळे निर्माण करण्यात आले.

xi. राजा या पदाला सर्वाधिक सामर्थ्य आणि प्रतिष्ठा प्राप्त झाली. राजाला राज्यकारभारात साहाय्य करण्यासाठी मंत्री आणि विविध अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाऊ लागली. हे मंत्री आणि अधिकारी मुख्यत्वे ब्राह्मण आणि क्षत्रिय असत.

**७. मध्ययुगीन काळातील समान जीवन यावर चर्चा करा.**

**उत्तर:**

i. भारतातील मध्ययुगीन काळ हा **परकीय आक्रमणांकडून झालेल्या पराभवाचा काळ** होता. सुरुवातीचे मुस्लीम आक्रमक भारतातील समृद्ध साधनसंपत्तीची लूट करण्याच्या उद्देशाने भारतात आले.

ii. दिल्लीच्या सुलतानशाही कालखंडात मूळ **भारतीय संस्कृती आणि इस्लामी संस्कृतीचा मिलाफ झालेला** पाहायला मिळतो. इंडो-इस्लामिक स्थापत्य; यांत्रिक साधनांचा वापर आणि हिंदू उर्दू (हिंदुस्थानी) भाषेचा उगम ही या काळाची वैशिष्ट्ये होती.

iii. अमीर खुस्रो हा तेराव्या शतकात होऊन गेला. त्याने हिंदुस्थानी भाषेच्या तत्कालीन रूपाचा 'हिंदवी' असा उल्लेख केला आहे.

iv. भारतातील हिंदू, जैन आणि बौद्ध मंदिरांची तोडफोड आणि विटंबना होण्यास दिल्लीची सुलतानशाही जबाबदार होती.

v. दिल्लीतील सुलतानशाहीत **सरंजामी पद्धतीची अधिकारांची उतरंड** होती. जी चार वर्गांवर आधारित होती. या काळातही जातिव्यवस्थेचे कठोर पालन केले जात होते.

vi. बादशाह अकबर याच्या पद्धतशीर प्रयत्नांमुळे भारताला एक समर्थ आणि स्थिर राजकीय प्रशासनपद्धती लाभली.

Sample content

vii. भारतात साम्राज्य विस्तार करणारे अनेक राजे होऊन गेले. त्यांपैकी काही कल्याणकारी, तर काही जुलमी राजवटी होत्या. काही साम्राज्यांमध्ये शांतता नांदत होती, तर काही भयाने आणि रक्तपाताने कलंकित झालेली होती. **भारतातील मध्ययुग हा सर्वाधिक अंध:काराचा काळ** असल्याचे अनेकदा म्हटले जाते.

viii. मध्ययुगीन काळात इतके बदल झाले, की भारतीय समाजाचे स्वरूप बदलून गेले. भारताच्या अंतर्गत आणि दूरवरच्या प्रदेशांशी असलेल्या व्यापाराच्या भरभराटीसोबतच ललित कला, स्थापत्य आणि शिल्प यांचाही उदय झाला.

ix. दिन-इ-इलाही हा अकबर बादशाहाने स्थापन केलेला धर्म नैतिक तर्कशुद्धतेवर आधारलेला होता.

**८. वसाहतकालीन प्रशासन आणि अर्थव्यवस्था यांचे वर्णन करा.**

**उत्तर:**

**i. वसाहतकालीन प्रशासन:**

अ. ब्रिटिशांनी नव्या प्रशासन पद्धतींचा अवलंब केला आणि नवीन प्रशासकीय यंत्रणा उभारली. कारभाराकरता त्यांनी आर्थिक, शिक्षण, महसूल आणि प्रशासकीय सेवा सुरू केल्या.

ब. हे सेवा विभाग ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या साहाय्याकरता स्थापन केले होते.

क. नवीन न्यायपद्धती निर्माण करण्यात आली. भारतातील पारंपरिक न्यायप्रणालींचा विचार करून तयार केलेल्या या नवीन न्यायपद्धतीची अंमलबजावणी मात्र धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वावर आधारलेली होती.

ड. वतनदार आणि जमीनदार यांचे चालत आलेले विशेष अधिकार रद्द करण्यात आले. यामुळे, भारतीय समाजात हळूहळू लोकशाही मूल्ये झिरपू लागली.

इ. 'इंडियन कौन्सिल्स ॲक्ट', 'इंडियन हायकोर्ट ॲक्ट', 'इंडियन सिव्हिल सर्व्हिस ॲक्ट १८६१' या सर्व कायद्यांमुळे कार्यकारी, कायदेविषयक आणि न्यायविषयक प्रशासन पद्धतीत महत्त्वाचे बदल घडून आले.

**ii. वसाहतकालीन अर्थव्यवस्था:**

अ. औद्योगिक वाढ आणि शहरीकरण यांमुळे वसाहतकाळात भारतीय अर्थव्यवस्थेत मूलभूत स्वरूपाचे बदल घडून आले.

ब. बदलती अर्थव्यवस्था आणि कारखान्यांच्या संख्येत होणारी वाढ यांमुळे जातीनुसार कौशल्ये, व्यवसाय आणि सामाजिक संबंध यांची चौकटही हळूहळू बदलू लागली.

क. शिक्षण आणि उत्पन्न या घटकांवर आधारित नवीन सामाजिक वर्ग उदयास आले. तसेच, जातीवर आधारित पारंपरिक विधिनिषेधांची बंधने हळूहळू गळून पडू लागली.

ड. ब्रिटिशांनी नवीन महसूल व्यवस्था लागू केली, जिचा शेतकऱ्यांवर विपरीत परिणाम झाला. तसेच, शेतीचे व्यापारीकरणही होऊ लागले.

इ. निर्वाह अर्थव्यवस्थेचे रूपांतर नफाधारित बाजारात व्यवस्थेत झाले. यामुळे, नगदी पिकांचे महत्त्व वाढून त्याचा परिणाम अन्नधान्याच्या उत्पादनावर झाला. १८५६ चा बंगाल आणि ओडिसा येथे पडलेला दुष्काळ या बदलाचा साक्षी आहे.

**९. स्वातंत्र्योत्तरकाळात भारताच्या घडणीत महत्त्वाच्या असलेल्या घटकांवर खालील मुद्द्यांच्या आधारे चर्चा करा:**

**i. भारताचे संविधान ii. कायदे iii. अर्थव्यवस्था**

**उत्तर:**

**i. भारताचे संविधान:**

अ. भारताचे संविधान तयार करण्यासाठी ६ डिसेंबर १९४६ साली मसुदा समिती स्थापन करण्यात आली. डॉ. बी. आर. आंबेडकर हे या समितीचे अध्यक्ष होते.

ब. विविध देशांच्या संविधानांतील तत्त्वांच्या विचार मंथनातून भारतीय संविधानाचा मसुदा तयार करण्यात आला. यामध्ये भारतातील वैविध्यतेचा आदर राखला गेला आहे.

क. भारतीय संविधान हे उदारता, समानता आणि बंधुता या मूल्यांची जोपासना करते. तसेच, ते धर्मनिरपेक्षतेलाही महत्त्व देते.

ड. भारतीय संविधानात वेळोवेळी काही महत्त्वाच्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. यांपैकी अलीकडेच केलेली सुधारणा म्हणजे ऑगस्ट २०१९ मध्ये जम्मू आणि काश्मीर प्रांताला विशेष दर्जा देणारे कलम ३७० रद्द करण्यात आले आहे.

**ii. कायदे:**

अ. शैक्षणिक संशोधन, शास्त्रीय अभ्यास, प्रसारमाध्यमे, आंदोलक गट आणि विशिष्ट विषयावर प्रत्यक्ष काम करणारे गट यांच्याद्वारे मिळालेल्या माहितीतून जनतेच्या समस्या अधोरेखित केल्या जातात. त्या संबंधातील आवश्यक कायदे संसदेत पारित केले जातात.

ब. कालानुरूप गरजा लक्षात घेऊन वेळोवेळी या कायद्यांमध्ये सुधारणा केल्या जातात किंवा कालबाह्य कायदे रद्दही केले जातात.

**iii. अर्थव्यवस्था:**

अ. अगदी अलीकडेपर्यंत भारताची आर्थिक वाढ ही नियोजित विकास योजनेनुसार १२ पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून होत होती. प्रत्येक पंचवार्षिक योजनेची स्वतंत्र उद्दिष्टे होती.

ब. राजकीय यंत्रणा आणि अर्थव्यवस्था या जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. अर्थव्यवस्थेसंबंधित निर्णय हे सरकारी ध्येयधोरणांना सुसंगत असतात.

Sample Content

क. समाजवादी तत्त्वांचे अनुसरण करणाऱ्या काळात त्या वेळच्या शासनाने शिक्षण आणि आरोग्य याची जबाबदारी काही दशके घेतली.

ड. १९९१ मध्ये जागतिकीकरणाची आणि त्यायोगे काही बदलांची सुरुवात झाली. याचे सकारात्मक आणि नकारात्मक असे दोन्ही पैलू समोर आले.

इ. २०१४ पासून चलनबंदी, वस्तू आणि सेवा कर (GST) द्वारे अंमलात असणारी समान करप्रणाली, विविध जनकल्याण योजना, सीमारहित व्यापार, स्वच्छ भारत मोहिम, उद्योजकांना प्रोत्साहन यांसारख्या गोष्टी अर्थव्यवस्थेच्या नियोजनात महत्त्वाच्या ठरल्या आहेत.



**ज्ञानगुरू**

नॅशनल इन्स्टिट्युशन फॉर ट्रान्सफॉर्मिंग इंडिया (नीति आयोग) हा पंचवार्षिक योजना देणाऱ्या नियोजन आयोगाच्या जागी येणारा भारतीय सरकारने नियुक्त केलेला नवीन नियोजन आयोग आहे.

**[टीप:**
नीती आयोगाविषयक अधिक माहिती मिळवण्यासाठी शेजारील Q. R. Code स्कॅन करावा.]


## ज्ञानाचे उपयोजन

**[टीप:** यामध्ये विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे ही व्यक्तिनिष्ठ असल्याने इथे दिलेली उत्तरे संदर्भादाखल दिलेली आहेत. विद्यार्थ्यांनी दिलेल्या कृती/उपक्रम स्वत:हून करून पाहणे अपेक्षित आहे.]

### कृती

**१. बौद्ध धर्मातील अष्टांग मार्गाची माहिती गोळा करा.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ५)

**उत्तर:** बौद्ध धर्मातील अष्टांगमार्ग हा आत्मज्ञान मिळवण्याचा मार्ग आहे. यात खालील घटक आहेत:




**२. हे माहीत करून घ्या.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ७)
**दुसऱ्या जागतिक युद्धाच्या काळात युरोपमध्ये प्रस्थापित केल्या गेलेल्या छळ छावण्यांची अधिक माहिती मिळवा.**

**उत्तर:**

**[टीप:**
विद्यार्थ्यांनी दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील युरोपमधील छळ छावण्यांची अधिक माहिती मिळवण्यासाठी शेजारील Q. R. Code स्कॅन करावा.]

**३. आधुनिक भारतीय स्त्रिया आणि उत्तर वैदिक काळातील स्त्रिया यांच्या सामाजिक स्थानामध्ये काही साम्य आहे का याची चर्चा करा. त्या संदर्भातील काही प्रथा-परंपरा २१ व्या शतकात अजूनही टिकून आहेत का?** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. १०)

**उत्तर:** विद्यार्थी खालील मुद्द्यांच्या आधारे या विषयावर चर्चा करू शकतात:
**उत्तर वैदिक काळातील स्त्रियांचे सामाजिक स्थान विरुद्ध आधुनिक भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान.**

**साम्य:**
i. पितृप्रधान कुटुंब व्यवस्था
ii. पितृवांशिक वारसा पद्धत

**फरक:**
i. आधुनिक भारतातील स्त्रियांचे उंचावलेले सामाजिक स्थान
ii. घरगुती कामांपलीकडे रुंदावलेल्या बाह्य क्षेत्रातील जबाबदाऱ्या
iii. शिक्षण आणि करिअरला देण्यात येणारे प्रचंड महत्त्व
iv. वारसाहक्काने मिळणाऱ्या संपत्तीत कायदेशीर अधिकार

**[टीप:** वरील मुद्दे हे परिपूर्ण नाहीत. विद्यार्थ्यांनी स्वत: अधिक संशोधन करून यातील साम्य आणि फरक यांवर चर्चा करणे अपेक्षित आहे.]

**४. मध्ययुगीन भारताच्या कलाक्षेत्रांतील पुढील गोष्टींवर मुस्लीम सत्तांचा काय प्रभाव पडला, याचा शोध घ्या. चित्रकला, स्थापत्य, संगीत. तुम्ही घेतलेल्या शोधाचे वर्गामध्ये सादरीकरण करा.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. १४)

**उत्तर:**

**i. चित्रकला:** मुघल चित्रकलेचा उगम हा पर्शियन चित्र पद्धतीतून झाला. अकबर बादशाहने त्याच्या दरबारात कुशल चित्रकारांची नियुक्ती केली होती. जहांगीरच्या काळात, दरबारातील आणि शिकारीच्या दृश्यांवर आधारित चित्रे रेखाटली जात असत. या काळातील चित्रे ही अधिक वास्तवदर्शी होती.

Sample Content

ii. **स्थापत्यकला:** मशिदी, मकबरे आणि राजवाडे यांवरील नक्षीदार आकृतिबंध स्थापत्यकलेचे प्रगत आणि उत्कृष्ट नमुने दर्शवतात. उदा. सलीम खिस्ती याच्या फतेपूरशिक्री येथील मकबऱ्यावरील कोरीव नक्षीकाम. लाल दगड व संगमरवर यांचा वापर, भव्य घुमट, कमानी ही स्थापत्यकलेची खास वैशिष्ट्ये होती. शहाजहान याचा काळ हा मुघल स्थापत्यकलेचा सर्वांत गौरवशाली काळ होता. लाल किल्ल्यातील दिवाण-इ-आम आणि दिवाण-इ-खास, जामा मशीद, मोती मशीद, ताजमहाल या काळातच बांधले गेले.

iii. **संगीत:** मुघल राजसत्तेच्या काळात हिंदू मंदिरांतून संगीत कला मुस्लीम राजदरबारात अवतरली; मात्र याचा भर भक्तिपर संगीतापेक्षा अधिक व्यावसायिक किवा कलात्मक सादरीकरणावर असे. या अभिजात संगीताच्या स्वरूपास ध्रुपद म्हटले जाई. ध्रुपद हे हिंदुस्थानी संगीत परंपरेत मोडते. भारतातील उत्तर प्रदेशात, तसेच पाकिस्तान आणि बांग्लादेश येथे ध्रुपद गायनाची साधना केली जाते. स्वामी हरिदास यांचे शिष्य तानसेन हे महान संगीतकार होते. ते आपल्या ध्रुपद रचनांसाठी प्रसिद्ध होते.

**५. चर्चा करा: वर्तमानकालीन भारतात आजही समाजसुधारणेच्या चळवळी सुरू आहेत.**

(पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. २०)

**उत्तर:** विद्यार्थी खालील मुद्द्यांच्या आधारे चर्चा करू शकतात:

i. सामाजिक सुधारणा चळवळींचा अर्थ
ii. सामाजिक सुधारणा चळवळींचा उद्देश
iii. सामाजिक सुधारणा चळवळींचे ताजे उदाहरण
**[टीप:** खाली दिलेल्या मुद्द्यांचा संदर्भ घ्या.**]**
iv. सामाजिक सुधारणा चळवळींमुळे समाजाला होणारे फायदे.

समाजसुधारणा चळवळी आणि त्यांचे फायदे यांची काही उदाहरणे (चर्चेसाठी संदर्भ मुद्दे) खालीलप्रमाणे आहेत:

**अ. टीच फॉर इंडिया चळवळ:** १९९१ मध्ये शाहीन मिस्त्री हिने भारतातील प्रत्येक मुलाला त्याच्या सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमीची पर्वा न करता गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे हे स्वप्न मनात घेऊन 'आकांक्षा फाउंडेशनची' स्थापना केली. २००६ मध्ये शाहिनने 'टीच इंडिया चळवळ' सुरू केली, कारण शैक्षणिक विषमता अजूनही मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात आहे याची तिला जाणीव झाली. जेव्हा उच्चशिक्षित लोक एकत्र येऊन उपेक्षितांना शिक्षित करतील तेव्हाच शैक्षणिक समानता साध्य करता येईल असा तिला विश्वास होता.

**टीप:**
टीच फॉर इंडिया चळवळीविषयी अधिक जाणून घेण्यासाठी बाजूचा Q. R. Code स्कॅन करावा.

**ब. डिआन दि मेनेझ्स हिचे मासिक पाळीदरम्यान स्वच्छतेविषयीचे भारतातील कार्य:** डिआन दि मेनेझ्सच्या रेड इज द न्यू ग्रीन या संस्थेचे मासिक पाळीशी निगडित सर्व गैरसमज आणि निषिद्ध गोष्टी दूर करण्याचे उद्दिष्ट आहे. मेनेझ्स हिने तरुण मुलींना मासिक पाळीमागचे शास्त्रीय कारण समजावण्यासाठी आणि त्यांना या गोष्टींची लाज वाटू नये, यासाठी कार्यशाळा घेतल्या. त्याचबरोबर मासिकपाळी दरम्यानच्या स्वच्छतेचे धडे देत सॅनिटरी पॅड्सची विल्हेवाट लावण्याकरता पर्यावरणस्नेही पर्यायही सुचवले.

**[टीप:**
डिआन दि मेनेझ्सचे मासिक पाळीविषयक विचार ऐकण्याकरता शेजारतील Q. R. Code स्कॅन करावा.]

**तुमची प्रगती तपासा.**

**१. i. पूर्व वैदिक काळातील शिक्षणपद्धती कशी होती?**
**ii. उत्तर वैदिक कालखंडामध्ये स्त्रियांच्या घसरलेल्या सामाजिक स्थानाची दोन लक्षणे सांगा.**
**iii. मध्ययुगीन भारतीय समाजाची कोणतीही दोन वैशिष्ट्ये सांगा.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. १८)

**उत्तर:**

i. या प्रश्नाच्या उत्तराकरता प्र.२ - ७ चे उत्तर अभ्यासा.
ii. मुलींच्या शिक्षणावर बंदी घालण्यात आली आणि स्त्रिया फक्त घरगुती कर्तव्यांशी बांधल्या गेल्या.
iii. दिल्लीतील सुलतानशाहीतील सरंजामी पद्धतीची अधिकारांची उतरंड आणि ताठर जातिव्यवस्था.

**२. वसाहतीच्या काळाच्या संदर्भात**
**i. शैक्षणिक बदलांची दोन नावे लिहा.**
**ii. अर्थव्यवस्थेशी संबंधित दोन बदलांची नावे लिहा.**
**iii. प्रशासन व्यवस्थेतील दोन बदलांची नावे लिहा.**

(पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. २०)

**उत्तर:**

i. इंग्रजी ही संपर्कभाषा बनली आणि शिक्षणपद्धतीतील विषय लौकिक जीवनाशी (सेक्युलर) संबंधित होते.
ii. औद्योगिक वाढ आणि नवीन महसूल व्यवस्था.
iii. नवीन न्यायव्यवस्था आणि विविध सेवा.

Sample Content

## सराव चाचणी

**वेळ: १.३० तास** **एकूण गुण: २५**

**प्र.१. योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.** **[३]**

१. दीक्षा घेऊन बौद्ध विहारामध्ये राहणाऱ्या पुरुषांना _______ म्हणत असत. (भिक्खू, भिक्खुणी, ऋषी)

२. _______ वर्णियांना उपनयन संस्काराचा अधिकार नसल्यामुळे ते द्विज म्हणजे दोनदा जन्म घेतलेले नव्हते असे मानले जाई. (क्षत्रिय, शुद्र, वैश्य)

३. स्पेशल मॅरेज ॲक्ट _______या वर्षी पारित करण्यात आला. (१९५०, १९५२, १९५४)

**प्र.२. टिपा लिहा. (कोणतीही एक)** **[४]**

१. मध्ययुगीन काळातील भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान.

२. पूर्व वैदिक काळातील शिक्षण व्यवस्था

**प्र.३. फरक स्पष्ट करा. (कोणताही एक)** **[४]**

१. ख्रिश्चन आणि इस्लाम धर्म

२. प्राचीन काळातील आणि वसाहत काळातील भारतीय शिक्षण पद्धती

**प्र.४. खालील विधान चूक की बरोबर हे सांगून सकारण स्पष्ट करा. (कोणतेही एक)** **[४]**

१. पूर्व वैदिक आणि उत्तर वैदिक काळात स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत काही समानता होत्या.

२. वसाहतकाळात दळणवळण आणि संपर्क क्षेत्रात सुधारणा झाल्या.

**प्र.५. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही एक)** **[१०]**

१. इस्लामिक शिक्षण पद्धतीवर चर्चा करा.

२. स्वातंत्र्योत्तरकाळात भारताच्या घडणीत महत्त्वाच्या असलेल्या घटकांवर खालील मुद्द्यांच्या आधारे चर्चा करा:

i. भारताचे संविधान ii. कायदे iii. अर्थव्यवस्था

Sample Content

सराव चाचणीची उत्तरे पाहण्याकरता विद्यार्थ्यांनी सोबत दिलेला **Q.R. Code** स्कॅन करावा.

# AVAILABLE NOTES FOR STD. XI & XII:

## SCIENCE

### Perfect Series:

For students who want to excel in board exams and simultaneously study for entrance exams.

- Physics Vol. I
- Physics Vol. II
- Chemistry Vol. I
- Chemistry Vol. II
- Mathematics & Statistics Part - I
- Mathematics & Statistics Part - II
- Biology Vol. I
- Biology Vol. II

### Precise Series:

For students who want to excel in board exams.

- Physics
- Chemistry
- Biology

### Additional Books for Std. XII Sci. & Com.:

- A collection of Board Questions (PCMB)
- A collection of Board Questions with solutions (PCMB)
- 20 Model Question Papers with solutions (PCMB & E)
- Solution to HSC Board Question Bank (Science)
- Solution to HSC Board Question Bank (Commerce)

## COMMERCE (ENG. & MAR. MED.)

### Smart Notes:

- Book-Keeping and Accountancy
- Book Keeping and Accountancy (Practice)
- Economics
- Organisation of Commerce and Management
- Secretarial Practice
- Mathematics and Statistics - I
- Mathematics and Statistics - II
- Supplementary Questions (BK • ECO • OCM • SP)

## ARTS (ENG. & MAR. MED.)

- History
- Geography
- Political Science
- Psychology
- Sociology

Books available for MHT-CET, NEET & JEE

### Languages:

- English Yuvakbharati
- Hindi Yuvakbharati
- Marathi Yuvakbharati




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App

## OUR PRODUCT RANGE

Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Stationery

Visit Our Website




Explore our range of STATIONERY

Marketed by:

Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning.

Address: 2nd floor, Aroto Industrial Premises CHS, Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road, Mulund (W), Mumbai 400 080
Tel: 88799 39712 / 13 / 14 / 15 • Website: www.targetpublications.org • Email: mail@targetpublications.org